www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ दिवेकरांचा दिवा महोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात सुरु...
पान ३ वर....



■ डोंगराळ भागातील आदिवासी बांधव उदरनिर्वाहसाठी...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक २०३ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, २७ डिसेंबर २०२४ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# सुशासनाच्या माध्यमातून एक ट्रिलीयन अर्थव्यवस्थेचा मार्ग बळकट होईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ■ महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक अहवालाचे अनावरण

● मुंबई, विशाल कारंडे :


**राज्याची प्रगती तेथील 'ईज ऑफ लिव्हींग' वर अवलंबून असते. त्यामुळे शासनही राज्यातील 'ईज ऑफ लिव्हींग' सुधारण्यासाठी प्राधान्याने काम करीत आहे. नागरिकांना विविध सेवा विनाविलंब मिळतात की नाही, यावरून राज्यातील सुशासन लक्षात येत असते. सुशासनाच्या माध्यमातून एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था करण्याचा मार्गही बळकट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**



सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक, २०२४ अहवालाचे अनावरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, कृषि विभागाच्या सचिव जयश्री भोज, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, वित्त विभागाच्या सचिव शैला ए तसेच अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संचालक कृष्णा फिरके, सहसंचालक सविता दिक्षीत आदी उपस्थित होते. दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे केंद्र शासनाच्या प्रशासनिक सुधारणा व नागरिकांच्या तक्रारी विभागाचे सचिव यु. श्रीनिवास यांनीही संबोधीत केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या सहकार्याने जिल्हा सुशासन निर्देशांक हा विविध क्षेत्रांच्या मापदंडानुसार सुशासनाची व्याप्ती दर्शविते. अतिशय विस्तृत अशाप्रकारचा हा निर्देशांक आहे. मागील काळात शासनाने लोककेंद्रीत प्रशासनावर भर देत नागरिकांना तक्रारी सोडविण्यासाठी आपले सरकार नावाचे पोर्टल उपलब्ध करून दिले. जिल्हा सुशासन निर्देशांक ही पद्धत केवळ रॅंकिंग दाखविणारी नाही, तर सुधारणा करण्यास वाव देणारी आहे. राज्यात जास्तीत जास्त गुण मिळणारे जिल्हे आणि कमी गुण मिळणाऱ्या जिल्ह्यांमध्ये गुणांचा फरक कमी आहे. त्यामुळे सर्वच जिल्हे प्रगती करताना दिसत आहेत. जिल्हा सुशासन निर्देशांक हा १० विकास क्षेत्रातील १६१ मापदंडांवर आधारीत असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी निर्देशांकात चांगली कामगिरी केलेल्या जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन केले. तसेच ज्या जिल्ह्यांची कामगिरी गुणवत्तेच्या आधारे उंचावणे गरजेचे आहे. त्या जिल्ह्यांनी कामगिरी सुधारत निर्देशांकात प्रगती करावी, यामध्ये पालक सचिवांनी लक्ष घालण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

## जिल्हा सुशासन निर्देशांकात क्षेत्रानुसार क्रमानुसार पहिले पाच जिल्हे

- ■ कृषी व संबंधित क्षेत्र : अमरावती, वाशिम, छत्रपती संभाजीनगर, लातूर, परभणी.
- ■ वाणिज्य व उद्योग : मुंबई शहर, रायगड, पुणे, पालघर, ठाणे.
- ■ मनुष्यबळ विकास : नाशिक, गोंदीया, पुणे, यवतमाळ, सातारा.
- ■ सार्वजनिक आरोग्य : सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, पालघर, बीड, रत्नागिरी.
- ■ पायाभूत सोयी - सुविधा : लातूर, नाशिक, बुलढाणा, चंद्रपूर, हिंगोली.
- ■ सामाजिक विकास : गोंदिया, अमरावती, नाशिक, धुळे, नागपूर.
- ■ आर्थिक सुशासन : मुंबई उपनगर, मुंबई शहर, रायगड, जळगांव, भंडारा.
- ■ न्यायप्रणाली व सुरक्षा : मुंबई उपनगर, मुंबई शहर, नागपूर, गडचिरोली, रायगड.
- ■ पर्यावरण : सांगली, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर.
- ■ लोककेंद्रीत प्रशासन : नाशिक, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती.



## () थोडक्यात ()



### अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिच्या हत्येप्रकरणी आरोपी पती-पत्नीला २ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी

**ठाणे :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झालीय. ठाण्यातील कल्याण पूर्वेकडील चक्कीनाका भागातील १२ वर्षांच्या मुलीचं अपहरण करून तिच्यावर एका नराधमानं स्वतःच्या राहत्या घरात अत्याचार करून तिची हत्या केल्यानं परिसरात एकच खळबळ उडालीय. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने तिचा मृतदेह रिक्षातून घेऊन जात भिवंडी तालुक्यातील बापगाव येथील निर्जनस्थळी फेकलाय. या घटनेतील मुख्य सूत्रधार विशाल गवळी याला बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथून, तर त्याची पत्नी साक्षी गवळी हिला कल्याण शहरातून अटक करण्यात आलीय. या दोघांना आज कल्याण जिल्हा न्यायालयात हजर केले असता २ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलीय.

### लाचखोर वनक्षेत्रपालाकडे सव्वा कोटी, ५८ तोळे सोने



**वसई :** जमिनीच्या प्रकरणात २० लाख रुपयांची लाच घेणाऱ्या मांडवीचा वनक्षेत्रपाल संदीप चौरे याच्या मिरा रोड येथील घरात एक कोटी ३७ लाखांची रोकड आणि ५८ तोळे सोने आढळून आले आहे. जमिनीच्या बाजूने निकाल देण्यासाठी मांडवी परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल संदीप चौरे याने २० लाखांची मागणी केली होती. त्यानुसार मंगळवारी पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्याविरोधात मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्याला पकडण्यासाठी सापळा लावला. मात्र तो फरार झाला होता. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रोख रकमेसह १ कोटी ३१ लाखांची रोकड आणि ५८ तोळे सोने जप्त केले आहे.या गुन्ह्यात वापरलेले वाहनही जप्त करण्यात आले आहे.

## आमदार बालाजी किणीकरांच्या हत्येचा कट रचणाऱ्या दोघांना अटक, तर दोघे फरार

● ठाणे, रोहित जैसवाल :

अंबरनाथचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या हत्येचा कट रचल्याच्या प्रकरणात अंबरनाथ शहरातून दोघांना ठाण्यातील गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आलंय. तर या हत्येचा कटातील दोन जण फरार झाले आहेत. पोलीस पथक त्याच्या शोधासाठी दिल्लीत दाखल झाले असून, लवकरच दोन्ही आरोपींना अटक होण्याची शक्यता वर्तविली जातेय. मात्र अटक केलेल्या दोन्ही आरोपींची नावे पोलिसांनी गुप्त ठेवलीत. आमदार किणीकर हे अंबरनाथ मतदारसंघातून चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आलेत. शिवाय ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे जवळचे आणि विश्वासू आमदार आहेत. ते आपल्या भावाच्या मुलाच्या लग्नासाठी लातूरला जाणार होते. त्याच लग्न समारंभाच्या ठिकाणी त्यांची हत्या करण्याचा डाव होता. मात्र याची पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी अंबरनाथ शहरातून दोघांना ताब्यात घेतलंय. एकाला खुंटवली गावातून तर दुसऱ्याला स्वामीनगरमधून ताब्यात घेऊन अटक करण्यात आलीय. शिवाय किणीकर यांच्या पोलीस बंदोबस्तातदेखील वाढ करण्यात आलीय. दरम्यान, याप्रकरणी किणीकर समर्थक आक्रमक झाले असून, अंबरनाथ बंदची हाक दिली जाणार असल्याचं सांगितलं जातंय. किणीकर या संदर्भात लग्नाहून आल्यानंतर पत्रकार परिषद घेणार आहेत. विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरातील राजकीय नेत्यांचा हत्येचा इतिहास पाहता आठवले गटाचे नरेश गायकवाड, भाजपाचे वसंत पांढरे, शिवसेनेचे नितीन वारिंगे, प्रसन्ना कुलकर्णी यांच्यासह देवराम वाळूंज, किशोर सुळे, रमेश गोसावी, अशोक गायकवाड या नेत्यांची हत्या झालीय.



## नितीन गडकरी यांच्या नावाने १० सराफा व्यावसायिकांची फसवणूक

● नागपूर, नितीन देवळेकर :

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा मुख्य सुरक्षा अधिकारी असल्याची बतावणी करून एका युवकाने शहरातील जवळपास १० सराफा व्यावसायिकांची लाखोंनी फसवणूक केली. त्या ठगबाज युवकाविरुद्ध सीताबर्डी, अंबाझरी आणि बजाजनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रोकडे ज्वेलर्समध्ये गडकरी यांच्या नावाचा वापर करुन फसवणूक करण्याचा प्रयत्न करताना या युवकाचे बींग फुटले.

बुधवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास बजाजनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रोकडे ज्वेलर्समध्ये एक युवक दागिने खरेदी करण्यासाठी आला. त्यांनी स्वतःचे नाव राजवीर ऊर्फ पंकज चावला असे सांगितले. "मी गडकरी साहेबांचा मुख्य सुरक्षा अधिकारी आहे. मला गडकरी साहेबांनी पाठवले आहे. गडकरी यांनी रोकडे ज्वेलर्समध्ये दागिने खरेदी करण्याचा सल्ला दिला.' अशी बतावणी त्याने केली. व्यवस्थापकाने त्याची ओळख संचालक राजेश रोकडे यांच्याशी करुन दिली. त्यानंतर त्याला दागिने खरेदी करण्यासाठी दुकानात नेले. त्या युवकाने पाच लाखांचे दागिने खरेदी केले आणि दागिन्याचे बिल धनादेशाने देणार असल्याचे सांगितले.
पान २ वर





### व्हॉट्सॲप ग्रूपवर टाकले ठकबाजाचे फोटो

■ राजेश रोकडे यांनी फसवणुकीचा प्रयत्न हाणून पाडल्यानंतर त्या तोतया सुरक्षा अधिकाऱ्याचे फोटो सराफा संघटनेच्या व्हॉट्सॲप ग्रूपवर टाकले. त्यानंतर लगेच कोठारी ज्वेलर्स आणि बटुकभाई ज्वेलर्सच्या संचालकांनी राजवीर चावला ओळखले आणि फसवणूक झाल्याची कबुली दिली. त्यामुळे लगेच पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यात आल्या.

## फेब्रुवारीपासून जेएनपीए ते गेट वे अवघ्या २५ मिनिटांत

● उरण, भावना जैन :

जेएनपीए बंदर ते मुंबईतील गेट वे ऑफ इंडियादरम्यान सुरू असलेला जलप्रवास फेब्रुवारीपासून जलद होणार आहे. सध्याचा तासाभराचा असलेला हा प्रवास अवघ्या २५ मिनिटांत वातानुकूलित ई स्पीड बोटमधून करता येणार आहे. त्यामुळे उरणकरांना गारेगार प्रवास सुविधा उपलब्ध होणारआहे.

या जलद प्रवासासाठी जादाचे दर आकारले जाणार आहेत. जेएनपीए बंदर ते गेट वे ऑफ या मार्गावरील लाकडी प्रवासी बोटींना सरत्या वर्षात अलविदा करण्याचा निर्णय जेएनपीए संचालक मंडळाने घेतला आहे.नवीन वर्षापासून बंदरातून मुंबईत प्रवाशांना घेऊन जाण्या-येण्यासाठी अद्यायावत स्पीड बोटी धावणार आहेत.
पान २ वर



## भुजबळ साहेब कालही आमचे नेते आणि आजही आमचेच नेते - सुप्रिया सुळे

● पुणे, अभिजित येरल्लू :



राष्ट्रवादी काँग्रेसने मंत्रिपद न दिल्याने नाराज झालेल्या छगन भुजबळांनी अजित पवारांविरोधात आक्रमक पवित्रा घेतलाय. भुजबळ हे भाजपामध्ये जाणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झालीय. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, छगन भुजबळ साहेब हे राज्याचे वरिष्ठ नेते आहेत. ते कुठल्याही पक्षात असले तरी त्यांनी गेल्या ४० - ४५ वर्षांमध्ये राज्यासाठी दिलेलं योगदान महाराष्ट्र कधी विसरणार नाही. पवार साहेबांच्या अनेक संघर्षात भुजबळ साहेब पवार साहेबांसोबत उभे राहिलेत. मी आयुष्यभर हे विसरणार नाही, त्यांच्यावर मोठा अन्याय झालाय, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्यात.
पान २ वर

## भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे निधन

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे निधन झालं आहे. श्वासोश्वास घेण्यासाठी त्रास होत असल्याने त्यांना दिल्लीच्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारताच्या उदारमतवादी धोरणाचे जनक असलेल्या मनमोहन सिंह यांच्या निधनानंतर जगभर हळहळ व्यक्त केली जात आहे.

प्रकृतीच्या कारणास्तव डॉ. मनमोहन सिंह हे गेल्या काही वर्षांपासून राजकारणापासून दूर होते. आता त्यांचं निधन झालं आहे. १९९१ साली देश आर्थिक संकटाशी सामना करत असताना त्यावेळचे अर्थमंत्री मनमोहन सिंह यांनी देशाची बाजारपेठ जगासाठी खुली केली. त्यांनी खासगीकरण-उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा मार्ग अवलंबला आणि देशाची अर्थव्यवस्था ही रुळावर आणली.



सन २००४ साली ज्यावेळी यूपीए सरकारने बहुमत गाठलं त्यावेळी डॉ.मनमोहन सिंह पहिल्यांदा पंतप्रधान बनले. २००८ साली अमेरिकेतील मंदीमुळे जगभरात मंदी निर्माण झाली. पण मनमोहन सिंहांच्या धोरणांमुळे भारताला त्याचा कोणताही फटका बसला नाही. त्यानंतर २००९ साली ते दुसऱ्यांदा पंतप्रधान बनले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज ठाण्यात

■ ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणाऱ्या स्वामित्व योजनेच्या ई प्रॉपर्टी कार्डचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार वाटप

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार सहभागी

● ठाणे, सचिन कदम :

ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणाऱ्या स्वामित्व योजनेच्या ई प्रॉपर्टी कार्डचे वितरण करण्याचा कार्यक्रम शुक्रवारी (दि.२७ डिसे.) रोजी दुपारी १२ : ३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केला आहे. या वितरण सोहळ्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होऊन लाभार्थ्यांना ई प्रॉपर्टी कार्डच्या उपयुक्ततेसंदर्भात संबोधित करणार आहेत. अशी माहिती आमदार निरंजन डावखरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या पत्रकार परिषदेला भाजप प्रवक्ते सागर भदे उपस्थित होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडियाचा भाग असलेल्या ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणाऱ्या "स्वामित्व योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगुन आ. निरंजन डावखरे यांनी या योजनेची महती पत्रकार परिषदेत विषद केली. देशातील ५५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागातील आहे. या गावांना स्वयंपूर्ण करण्यासह गावकऱ्यांची आर्थिक पत उंचावणारी ही स्वामित्व योजना आहे. अनेकदा आपली हद्द कुठली हे गावकऱ्यांना माहित नसते, जमिनीच्या मालकी हक्कावरून वादविवाद होत असतात अथवा जमिनीवर बळजबरीने कब्जा केलेला असतो.
पान २ वर

### ई प्रॉपर्टी कार्डचा उपयोग काय?

■ स्वामित्व योजनेतून मिळणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्डला मोठे महत्व आहे. या योजनेद्वारे गावातील मिळकतधारकाला प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करून 'दस्तेवजाचा हक्क' प्रदान करत असल्याने गावकऱ्यांची लालफितीच्या कारभारातुन सुटका होणार आहे. प्रॉपर्टी कार्ड हा मालकीचा पुरावा असल्याने मालमत्तेचे विवाद कमी होणार आहेत. या प्रॉपर्टी कार्डवर कर्ज देखील काढता येणार आहे. ग्रामपंचायतीलाही कर आकारणी करणे शक्य होवून गावाचा विकास करणे सहजसाध्य होणार आहे. ई प्रॉपर्टी कार्डमुळे अन्य काही स्वः उत्पन्नाचे स्रोत निर्माण होणार असल्याचे आ. डावखरे यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

# चिंता वाढल्या कर्जबाजारीपणाची

देशातील जनतेच्या डोक्यावरील कर्जाचा भार दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर आलं आहे. एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीणसह शहरी भागातील जनता कर्जाच्या जागतिकीकरणानंतर बदललेल्या अर्थकारणामुळे पैशांचा ओघही वाढत गेला. याची फळे ज्यांना मिळाली त्यांची आर्थिक स्थिती सुधारत गेली. पण त्याचबरोबर आर्थिक विषमताही वाढत गेली. ती वाढत वाढत आता दहा टक्के लोकांकडे देशाच्या एकूण संपत्तीच्या ७० टक्के संपत्ती एकवटण्यापर्यंत येऊन पोहोचली आहे. याचाच दुसरा अर्थ उर्वरित ९० टक्के जनता केवळ ३० टक्के संपत्तीच्या श्रेणीत आहे.

या श्रेणीतील वर्ग एका बाजूला वाढत्या आशाआकांक्षा, वाढलेल्या गरजा, वाढलेली महागाई, त्यातून जीवन जगण्यासाठीचा वाढलेला खर्च, चांगले शिक्षण आरोग्य यांसाठी मोजावा लागणारा भरमसाठ पैसा आणि दुसरीकडे बेरोजगारी, कामगार कपात, आर्थिक मंदी, नैसर्गिक आपत्ती यांमुळे आक्रसलेले उत्पन्न यांचा सामना करत गुजराण करत आहे. अशा स्थितीमध्ये जगताना तरून जाण्यासाठी कर्जाचा आधार गरजेचा ठरत गेला.

काही वर्षांपूर्वीपर्यंत खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन वर्षानुवर्षे त्यांचे हप्ते भरत राहणार्यांची आणि या कर्जखात्यांचे नूतनीकरण करणायांची संख्या मोठी होती. पण कायद्यांच्या मार्गाने सावकारशाहीचे पाश आवळले गेले व पुढे बँकिंग सेवांचा प्रसार- प्रचार आणि विस्तार मोठ्या प्रमाणावर होत गेल्याने कर्जदाता बदलला. आज बँका, सहकारी पतसंस्था, एनबीएफसी यांसारख्या वित्तपुरवठा करणायांची सद्दी इतकी झाली आहे आणि त्यांच्यामधील स्पर्धा इतकी तीव्र बनली आहे की, पूर्वी कर्ज मिळवण्यासाठी करावी लागणारी यातायात संपून, आता 'कर्ज हवे आहे का' यासाठी रेटा लावला जात आहे.

बदलत्या काळात क्रेडिट कार्ड नावाचा प्लॅस्टिक मनी अवतरला आणि त्याने बहुतांश जणांच्या खिशातून हजारो कोटी रुपये केवळ दंडाच्या रूपातूनच वसूल केले. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०२२- २३ च्या आकडेवारीच्या आधारे सांख्यिकी मंत्रालयाने अलीकडेच जारी केलेला वार्षिक मॉड्यूलर सर्वेक्षण अहवाल देशातील नागरिकांवर वाढलेल्या कर्जाच्या ओझ्यावर नवा प्रकाश टाकणारा आहे. या अहवालानुसार, भारतातील खेड्यांमध्ये १ लाख लोकांमागे १८ हजार ७१४ लोक आहेत ज्यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कर्ज घेतले आहे, तर शहरांमध्ये हा आकडा १७ हजार ४४२ इतका आहे. विळख्यात अडकली आहे.

विशेष म्हणजे देशाच्या ग्रामीण भागातील महिलांवर कर्जाचा बोजाही जास्त आहे. गावातील एक लाख महिलांपैकी १३ हजार १६ महिला कर्जबाजारी आहेत, तर शहरांमध्ये १० हजार ५८४ महिला कर्जदार असल्याचे आढळून आले. शहरातील लोकांपेक्षा खेड्यातील लोकांवर कर्जाचा बोजा जास्त असल्याचे हे दुष्टचक्र अनेक वर्षांपासून सुरू आहे. २०१६ च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवालानुसार, खेड्यांतील ३१.४ टक्के कुटुंबांनी कर्ज घेतले होते, तर शहरांमधील २२.४ टक्के कुटुंबे कर्जबाजारी होती. त्या आकडेवारीवरून असेही दिसून आले की खेड्यांमध्ये व्यावसायिक (बँका) आणि गैर-व्यावसायिक संस्थांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अनुक्रमे ५६ आणि ४४ टक्के होते. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, शहरी भागांतील लोकांप्रमाणेच ग्रामीण भागातही ईएमआयवर वस्तू खरेदी करणार्यांची संख्या वाढत आहे. पण कर्जबाजारीपणा वाढण्याचे ते एकमेव किंवा प्रमुख कारण बिलकूलच नाहीये. मुळातच प्रचंड प्रमाणात वाढत चाललेल्या महागाईमुळे आज शहरी आणि ग्रामीण भागातील कुटुंबाचा मासिक खर्च भरमसाठ वाढला आहे. या वाढत्या खर्चामुळे देशात कर्जबाजारीपणा वाढत चालला आहे. गेल्या १० वर्षांमध्ये ग्रामीण भागात कुटुंबाचा खर्च १६४ टक्क्यांनी वाढला आहे, तर शहरी भागात कुटुंबाचा खर्च हा १४६ टक्क्यांनी वाढल्याची माहिती याच अहवालात देण्यात आली आहे. पण गेल्या दहा वर्षांत उत्पन्न मात्र वाढलेले नाही. उलट बेरोजगारीसारख्या समस्यांमुळे उत्पन्नात घटच झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात शेतकरी मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी झालेले दिसतात. देशातील शेतकर्यांनी घेतलेल्या कर्जात सातत्याने वाढ होत आहे. प्राधान्य क्षेत्र कर्ज नियमानुसार, सरकारने बँकांना त्यांच्या एकूण कर्जाच्या १८ टक्के कृषी आणि संबंधित क्षेत्राला प्रदान करणे बंधनकारक केले आहे. पाच वर्षांपूर्वी शेतकर्यांना दिलेले पीककर्ज ८.२५ लाख कोटी रुपये होते. २०२३-२४ या वर्षांत शेतकयांना दिलेले एकूण कर्ज २५.४७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. वाढता उत्पादन खर्च, शेतकयांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव नसणे यामुळे देशातील अन्नदाता कर्जबाजारी होत चालला आहे. शहरी भागात सुबत्ता दिसत असली तरी चैनीची प्रवृत्ती वाढत चालल्यामुळे आणि प्रतिष्ठेखातर आलिशान जीवनशैलीसाठी खर्च करण्याची मानसिकता बळावत चालल्याने मोठ्या प्रमाणावर शहरी कुटुंबे कर्जाच्या बोजात बुडाली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या एका आकडेवारीनुसार, एप्रिल २०२३ मध्ये भारतातील क्रेडिट कार्डची एकूण थकबाकी २ लाख कोटी रुपयांवर गेली आहे. एप्रिल २०२३ मध्ये हा आकडा २ लाख २५८ कोटी रुपये इतका होता. २०२२ च्या तुलनेत तो सुमारे ३० टक्क्यांनी अधिक होता. इतिहासात पहिल्यांदाच क्रेडिट कार्डवरील थकबाकीचा आकडा २ लाख कोटी रुपयांच्या पार गेल्याने आरबीआयनेही याबाबत चिंता व्यक्त केली होती. दुसरीकडे बँका आणि वित्तीय संस्थांकडून दिल्या गेलेल्या वैयक्तिक कर्जांमध्ये मोठी वाढ झाली आहे. जुलै २०२४ अखेरीस ते तब्बल ५५.३ लाख कोटी रुपये झाले आहे. अलीकडील काळात गोल्ड लोन देणार्या कंपन्यांची प्रक्रिया सुलभ झाली आहे आणि ते देणार्या कंपन्याही वाढल्या आहेत. पण यामुळे देशात कधी गरजेसाठी तर कधी हा पैसा शेअर बाजारात गुंतवून भरभक्कम परतावा मिळवण्यासाठी सोने गहाण ठेवणायांची संख्या लक्षणीय वाढली आहे. चालू आर्थिक वर्षांच्या पहिल्या सात महिन्यांत सोन्याच्या दागिन्यांसाठी बँकांनी दिलेल्या कर्जात तब्बल ५०.४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. इतर प्रत्येक वैयक्तिक कर्ज विभागातील क्रेडिट सिंगल डिजिटमध्ये वाढले असताना ही वाढ लक्षणीय ठरत आहे.

# ......तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल !

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी



होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते.

दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

**जुने जाऊ द्या मरणागुनी.....**
**जाळूनी किंवा पुरूनी टाका....**

या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

**श्याम ठाणेदार,**

# कॅनडामार्गे अमेरिकेत भारतीयांची मानवी तस्करी

## २५० हून अधिक कॅनेडियन कॉलेज संशयाच्या भोवऱ्यात; ईडीची छापेमारी

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** कॅनडामार्गे अमेरिकेत भारतीयांची मानवी तस्करी होत असल्याचा भारताच्या केंद्रीय तपास संस्थेला (ईडी) संशय आहे. ईडीला या प्रकरणात कॅनडातील २६० महाविद्यालयांचीही संशयास्पद भूमिका आढळली आहे. हा गुन्हा आंतरराष्ट्रीय सिंडिकेट करत असल्याचे ईडीने सांगितले. ३ वर्षांपूर्वी २०२२ मध्ये कॅनडामार्गे बेकायदेशीरपणे अमेरिकेत प्रवेश करताना एका गुजराती कुटुंबाचा मृत्यू झाला होता. ज्या तस्करांनी त्यांना सीमेपलीकडे नेले होते त्यांनी त्यांना उणे ३७ अंश सेल्सिअसच्या बर्फाच्या वादळाच्या मध्यभागी सोडले होते.

अहमदाबाद पोलिसांनी या प्रकरणी एफआयआर दाखल केला होता. या एफआयआरमध्ये भावेश अशोकभाई पटेल आणि इतर काहींना प्रिव्हेंटिव्ह मनी लाँडरिंग ॲक्ट (पीएमएलए) अंतर्गत आरोपी करण्यात आले होते. ईडीच्या अहमदाबाद प्रादेशिक



कार्यालयाने १० आणि १९ डिसेंबर रोजी मुंबई, नागपूर, गांधीनगर आणि वडोदरा येथे ८ ठिकाणी शोध मोहीम राबवली.

हे तस्कर प्रथम कॅनडाच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करतात, असे ईडीच्या तपासात समोर आले आहे. यानंतर जेव्हा एखादी व्यक्ती कॅनडामध्ये पोहोचते तेव्हा ते त्याला बेकायदेशीरपणे सीमा ओलांडायला लावतात आणि अमेरिकेला पाठवतात. या सर्व कामासाठी हे आरोपी प्रति व्यक्ती ५५ ते ६० लाख रुपये घेतात, असे तस्करांकडून सांगण्यात आले. मुंबई आणि नागपुरातील दोन एजंट दरवर्षी सुमारे ३५ हजार लोकांना अवैधरित्या परदेशात पाठवतात, असेही झडतीदरम्यान समोर आले.

या रॅकेटमध्ये एकट्या गुजरातमधील १७०० एजंट आणि भारतभरातील सुमारे ३,५०० एजंट सामील होते. त्यांच्यावर कारवाई केल्यानंतरही आठशेहून अधिक एजंट या कामात गुंतले आहेत. कॅनडातील सुमारे २६० महाविद्यालयेही या रॅकेटमध्ये सहभागी आहेत. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ब्रिटनमध्ये जाण्यासाठी लोक डंकी रुट अवलंबतात. भारत ते अमेरिकेचे अंतर सुमारे १३,५०० किमी आहे. विमानाने येथे पोहोचण्यासाठी १७ ते २० तास लागतात. मात्र, डंकी मार्गाने हे अंतर १५ हजार किमीपर्यंत पोहोचते आणि या प्रवासाला काही महिने लागतात.

# बीडमध्ये पोलिस चौकीसमोरच तरुणावर कोयत्याने वार

**बीड (सचिन कदम ) :** संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर बीड पोलिस प्रशासनाची तक्तरे वेशीवर मांडली जात असतानात अशा गुन्हेगारी घटना मात्र थांबण्याचं नाव घेत नाहीत. बीड जिल्ह्यातील वाढलेल्या गुन्हेगारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक राहिला नसल्याचे दर्शविणारी आणखी एक घटना समोर आली आहे. अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयाजवळील पोलिस चौकीच्या समोरच एका तरुणावर चौघांनी चाकू आणि कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात जमीर उर्फ मुन्ना मोहिद्दीन शेख हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती सध्या चिंताजनक आहे. जमीरचा भाऊ शेख मतीनने दिलेल्या फिर्यादीनुसार, श्रीहरी मुंडे हा जमीरला दारू पिण्यासाठी आग्रह करत होता. यावेळी जमीरने त्यास नकार देऊन त्याला शिवीगाळ केली. त्यानंतर गुरूवारी रात्री १२.३० वाजता जमीर स्वाराती रूग्णालयासमोरील चौकात बसला असताना श्रीहरी मुंडे याने त्यास पोलीस चौकीजवळील एटीएम समोर बोलावले. जमीर तिथे जाताच श्रीहरीने शिवीगाळ का केली असा जाब विचारत जमीरच्या मानेवर चाकूने वार केला. आरोपीसोबत असलेल्या आर्यन मांदळे आणि इतर दोघांनी कोयता आणि चाकूने जमीरवर प्राणघातक हल्ला केला असे फिर्यादीत नमूद आहे. सदर फिर्यादीवरून श्रीहरी मुंडे, आर्यन मांदळे आणि इतर दोन अनोळखी तरुणांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या जमीरवर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. जिल्ह्यात जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ३६ खून झाल्याची नोंद आहे. यात परळीतील सरपंचाच्या खुनाचाही समावेश आहे. यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्याचाही समावेश होता. याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. याला अनेक महिन्यांचा कालावधी उलटला तरी हा नेता अद्यापही एलसीबी आणि स्थानिक पोलिसांना सापडलेला नाही. तसेच खून करण्याचा प्रयत्न केल्याच्याही १६८ घटनाही घडलेल्या आहेत. गर्दी करून मारामारी करणे, दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे १० महिन्यांत दाखल आहेत.

## पान १ वरून...

### नितीन गडकरी यांच्या नावाने १० सराफा...

त्यामुळे राजेश रोकडे यांना संशय आला. त्यांनी गडकरी यांच्या कार्यालयात फोन करून राजवीर चावला या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्याबाबत माहिती घेतली. राजवीर चावला नावाचा कोणताही सुरक्षा अधिकारी नसल्याचे कार्यालयातून कळविण्यात आले. यादरम्यान तो युवक पळून गेला. रोकडे यांनी लगेच सीसीटीव्ही फुटेजमधून त्या ठकबाज युवकाचा फोटो घेऊन बजाजनगर पोलीस स्टेशन गाठले. लेखी तक्रार दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला, अशी माहिती अंबाझरीचे ठाणेदार विनायक गोल्हे यांनी दिली.

बटुकभाई आणि कोठारी ज्वेलर्सची फसवणूक

सीताबर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बटुकभाई ज्वेलर्समध्ये दोन दिवसांपूर्वीच हा राजवीर चावला गेला होता. त्याने भाजप नेते गडकरी यांचा मुख्य सुरक्षा अधिकारी असल्याचे सांगून तब्बल ५ लाख रुपये किंमतीचे दागिने खरेदी केले. त्यांना बनावट धनादेश देऊन बील दिले. त्यानंतर तो अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोठारी ज्वेलर्समध्ये गेले. तेथेही त्याने गडकरी यांच्या नावाचा वापर करुन २.५७ लाख रुपये किंमतीचे दागिने विकत घेतले. तेथेही त्याने धनादेशाने बील दिले. दोन्ही सराफा व्यवसायिकांनी गडकरी यांचे नाव सांगितल्यामुळे विश्वास ठेवला. मात्र, त्या युवकाने त्यांची फसवणूक केली.

### फेब्रुवारीपासून जेएनपीए ते गेट वे अवघ्या २५...

या प्रदूषणविरहित स्पीडबोटीमुळे २५ मिनिटांत प्रवाशांना जेएनपीएहून मुंबईत पोहचता येणार आहे. याचा फायदा या सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वांनाच होणार आहे. या सागरी मार्गाने जेएनपीएचे कामगार, नातेवाईक, स्थानिक प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी वापर करता येत आहे.सकाळी सात वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत या मार्गावरून बोटी सुरू असतात.

प्रदूषणविरहित स्पीड बोटींचा पर्याय

जेएनपीए प्रशासनाने लाकडी प्रवासी बोटी बंद करण्याचा निर्णय घेऊन त्याजागी प्रदूषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयीसुविधांनी सुसज्ज असलेल्या स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारला आहे. प्रदूषणविरहीत, सुरक्षित आणि कमी वेळेत मुंबईत ये-जा करण्यासाठी स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारण्याची संकल्पना जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी अमलात आणण्यासाठी सूचना केली होती. त्याची अंमलबजावणी सुरू करण्यासाठी जय्यत तयारी सुरू केली असल्याची माहिती जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दिली. जेएनपीएने १० वर्षाच्या कालावधीसाठी दोन स्पीड बोटींच्या ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० खर्चाच्या निधीलाही २० डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली असल्याची माहिती जेएनपीएचे विश्वस्त रवींद्र पाटील यांनी दिली.

### भुजबळ साहेब कालही आमचे नेते आणि...

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे आज पुणे दौऱ्यावर होत्या. त्यावेळी त्या पत्रकारांशी बोलत होत्या.
मला अजूनही तो दिवस आठवतो, जेव्हा त्यांना अटक झाली. त्यांच्या वेदना अन् संघर्ष मी जवळून पाहिलाय. मी अनेकदा जेलमध्ये त्यांना भेटायला गेलीय. त्याचं कुटुंब फार दुःखातून गेलंय. त्यांनी आयुष्यभर संघर्ष केलाय. भुजबळ साहेब लढवय्या नेते आहेत. वयाने तसेच नेतृत्वाने भुजबळ मोठे नेते आहेत. ते कालही आमचे नेते होते आणि आजही आमचे नेते असल्याचं सुप्रिया सुळेंनी अधोरेखित केलंय. सुप्रिया सुळे यांना तुम्ही भुजबळ साहेबांना तुमच्या पक्षात येण्याचं आमंत्रण देत आहात का असं विचारलं असता त्या म्हणाल्या की, आमंत्रण देण्याचा विषयच नाही. आमचे संबंध भुजबळ साहेबांच्या कुटुंबांसोबत कायम आहेत. आम्ही कोणासोबत कौटुंबिक संबंध तोडत नाही. संघर्ष काळात मी त्यांचे दुःख जवळून पाहिलंय. अडचणीच्या काळात त्यांच्या कुटुंबाने जे भोगलंय ते वेदनादायी आहे. त्यांच्या पक्षातील अंतर्गत गोष्टींबद्दल मला माहीत नाही. माझं पोट मोठं आहे, सगळ्या पोटातल्या गोष्टी ओठावर आणायच्या नसतात. सगळं बोलायचं नसतं, असंही यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्यात. तसेच बीड आणि परभणी येथील घटनेबाबत सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, संदीप क्षीरसागरांसह इतर नेत्यांनी न्याय मिळवण्यासाठी आवाज उठवलाय. सगळ्यात आधी तिथं पवार साहेब गेलेत. त्यानंतर सत्तेत असलेले नेते तिकडे गेले. खरं तर हा विषय संवेदनशील आहे. राज्य सरकारला विनंती आहे की, यात राजकारण आणू नये, राजकारण बाजूला ठेवून महाराष्ट्राला न शोभणारी ही घटना आहे. या दोन्ही कुटुंबीयांना परभणी आणि बीडमधील नेत्यांनी न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती आहे. तसेच सरकारला विधानसभेत मोठं यश मिळालेलं असल्यानं त्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेऊन त्याला न्याय दिला पाहिजे, असंही यावेळी सुळेंनी सांगितलंय.
बीड कुटुंबीयांना सर्वच जण भेट देऊन आश्वासन देत आहेत. मात्र कारवाई केली जात नाहीये. याबाबत सुप्रिया सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, सरकार कारवाई का करीत नाही याचे उत्तर सत्ताधाऱ्यांना विचारलं पाहिजे. मला प्रश्न विचारण्याऐवजी गृहमंत्र्यांना याबाबत विचारलं पाहिजे, हा गंभीर विषय आहे. राजकारण होत राहील, पण कुटुंबावर होणारा अन्याय थांबला पाहिजे, दोन्ही कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे, अशी भावनाही सुप्रिया सुळेंनी व्यक्त केलीय.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज ठाण्यात

अशा चुकीच्या गोष्टींना आळा बसुन पारदर्शीपणा यावा यासाठी, तसेच गावकऱ्यांना आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य सरकारने स्वामित्व योजनेतर्गत ई प्रॉपर्टी कार्डच्या माध्यमातुन एक पाऊल टाकले आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील ३० हजार ११५ गावांतील जनतेचे भवितव्य बदलणारी ही योजना असुन १५ हजार ३२७ गावांना ई प्रापर्टी कार्ड वाटप होणार आहे. शुक्रवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान लाभार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ठाणे जिल्ह्यातील ३९ ग्रामपंचायतीमधील ४३ गावांतील ४ हजार ५२३ जणांना त्यांच्या मालमत्तेचे ई प्रॉपर्टी कार्ड वितरीत करण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमाला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, जिल्हयातील सर्व आमदार तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे उपस्थित राहणार असल्याचे डावखरे यांनी सांगितले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## वीर बाल दिवस



ठाणे महानगरपालिकेच्यावतीने, 'वीर बाल दिवसा'च्या निमित्ताने शिखांचे दहावे गुरू, गुरू गोबिंद सिंग यांचे छोटे साहिबजादे, बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महापालिका भवन येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास प्र. उप माहिती व जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, तसेच, संदीप झिनवाल यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# दिवेकरांचा दिवा महोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात सुरु

## आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री यांच्या हस्ते उदघाट्न पार पडले

**ठाणे (विवेक गुंजाळ)**- दिवा विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या परिसरातील समाजाच्या संस्कृतीच जतन करणे, संवर्धन करणे या उद्देशाने धर्मवीर मित्र मंडळ आयोजित दिवा महोत्सव या भव्यतम समाज सोहळ्याचे आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री यांच्याहस्ते श्रीफळ फोडून उदघाटन झाले. सदर मोहत्सवाचे आयोजन २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२४ या कालावधी करण्यात आले आहे. महोत्सवामध्ये सामाजिक ,सांस्कृतिक, प्रगतिशील वाटचालीचे तसेच वैशिष्ट्यपूर्ण परंपरा व आगळे वेगळे चित्र साकारले जाणार आहेत. तसेच दररोज युवा पिढीचे कलाविष्कारांनी




नटलेले बहारदार कार्यक्रम कला, क्रीडा , शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.पहिल्याच दिवशी शालेय विदयार्थ्यांच्या चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

सदर दिवा मोहत्सवास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खसदार डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे संयोजक शहरप्रमुख तथा मा. उपमहापौर रमाकांत दशरथ मढवी यांनी केले असून प्रसंगी उपशहर प्रमुख तथा मा. नगरसेवक शैलेश पाटील, दीपाली उमेश भगत, अमर पाटील, दर्शना चरणदास म्हात्रे, दीपक जाधव, सुनिता गणेश मुंडे तसेच प्रमुख पदाधिकारी अर्चना निलेश पाटील, गुरुनाथ पाटील, चरणदास म्हात्रे, शशिकांत पाटील, भालचंद्र भगत, आदेश भगत, निलेश म्हात्रे, शैलेश भगत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत.

# कल्याणमध्ये तळीरामांची पोलीस उपायुक्तांकडून खरडपट्टी

**कल्याण (आकाश कांबळे)** – कल्याण, डोंबिवली शहरांमधील वाढती गुन्हेगारी, गर्दुल्ल्यांचा वाढता उपद्रव पाहून आता पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनीच रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी रात्री कल्याण शहराच्या विविध भागात उघड्यावर गांजा, मद्य, अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या दहा तळीरामांना पोलिसांनी पकडले. या तळीरामांना उपायुक्त झेंडे यांच्यासमोर हजर करण्यात आले. त्यानंतर उपायुक्त झेंडे यांनी आक्रमक पवित्रा घेत तळीरामांना पोलीस खाक्या दाखवत खरडपट्टी काढली.



पुन्हा अंमली पदार्थ, गांजा, तंबाखुजन्य पदार्थ सेवन करणार नाही, अशी तंबी देत पकडून आणलेल्या तळीरामांना उपायुक्त झेंडे यांच्या उपस्थितीत पोलीस अधिकाऱ्यांनी उठाबशा काढायला लावल्या. २५ ते ३० वयोगटातील हे तरूण होते. कल्याण शहराच्या विविध भागात ते अंमली पदार्थ सेवन करताना पोलिसांनी पकडले. कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या आवारात तळीरामांची उपायुक्तांनी हजेरी घेतली.

कल्याण रेल्वे स्थानकाच्या बाहेर रात्रीच्या वेळेत गर्दुल्ले, तळीराम पादचाऱ्यांवर हल्ला करून त्यांना लुटण्याचे प्रकार करत आहेत. कल्याण, डोंबिवली शहरांच्या खाडी किनारी भागात, मोकळ्या जागांमध्ये रात्री नऊ वाजल्यानंतर तरूणांचे जथ्थे अंमली पदार्थ सेवन करण्यासाठी बसतात. उघड्यावर हे प्रकार सुरू असतात. तरूणांची एक पीढी या प्रकाराने बरबाद होत असताना स्थानिक पोलीस करतात काय, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. काही भागात गावठी दारूचे अड्डे सुरू आहेत. परिसरातील नागरिकांना या अड्ड्यांचा, मद्यपींचा त्रास होतो. याविषयी तक्रारी करूनही स्थानिक पोलीस काही कारवाई करत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर आता उपायुक्त झेंडे हेच कल्याण, डोंबिवली परिसरातील गैरधंदे बंद करण्यासाठी रस्त्यावर उतरल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मागील दोन महिन्यांपासून उपायुक्त झेंडे यांच्या आदेशावरून स्थानिक पोलिसांनी रस्ते, पदपथ अडवून व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर फौजदारी कारवाई सुरू केली आहे. रस्ते अडवून व्यवसाय करणाऱ्या रिक्षा चालकांवर पोलीस फौजदारी कारवाई करत आहेत. मागील चार वर्षाच्या काळात कल्याण पोलीस उपायुक्त कार्यालयाकडून कधीही अशाप्रकारची आक्रमक कारवाई कल्याण, डोंबिवली शहर हद्दीत करण्यात आली नव्हती. उपायुक्त झेंडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून शहरातील गैरधंदे मोडून काढण्याचे आदेश दिले आहेत. स्थानिक पोलीस ठाणी आता कामाला लागली आहेत. उपायुक्त अतुल झेंडे यांनी अचानक डोंबिवली मोठागाव खाडी किनारा, देवीचापाडा जेट्टी, नवापाडा, गणेशनगर चौपाटी, कोपर गाव खाडी, माणकोली उड्डाण पूल भागात अचानक रात्री नऊ वाजल्यानंतर स्थानिक पोलिसांना माहिती न देता दौरा करून या भागात सरू असलेल्या गैरधंदे, गैरप्रकारांची पाहणी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# सैनिकांच्या सन्मानार्थ ठाणेकर धावणार

## शनिवारी ठाण्यात सोल्जर रन

**ठाणे (सम्यक कासारे) -:** अंबर कॅन्सर केअर ट्रस्ट आणि भाजपच्या मा. नगरसेविका स्नेहा रमेश आंब्रे यांच्या वतीने शनिवारी (दि. २८) सोल्जर रन चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सागर रमेश आंब्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली. "चला धाम्यावर, देशासाठी-सैनिकांच्या सन्मानासाठी" असे घोषवाक्य घेऊन "सोल्जर रन" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, वन मंत्री गणेश नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आ. संजय केळकर, प्रवीण चव्हाण, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, ठामपा आयुक्त सौरभ राव आदी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सायकल आणि धावणे अशा पद्धतीने या सोल्जर रनचे



आयोजन करण्यात आले आहे. वयोगटानुसार २,३ आणि ५ किलोमीटर धावण्याची शर्यत आणि ५ किलोमीटर सायकल शर्यत या दरम्यान होणार आहे. पहाटे ५.३० ते सकाळी ८.३० या वेळेत काशीनाथ घाणेकर नाट्यगृहासमोर या स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेदरम्यान शहीद सैनिकांना आदरांजली अर्पण करून माजी सैन्याधिकारी आणि संरक्षण खात्यातील निवृत्त अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे, असे डॉ. सागर आंब्रे यांनी सांगितले.

# अंध - दिव्यांगांना रस्ता ओलांडण्यासाठी तीन हात नाक्यावर रॅम्प बसवणार आणि बीप वाजणार



**ठाणे (यश सावंत)** - रस्ते किंवा सिग्नल ओलांडण्यासाठी पादचाऱ्यांसह अंध दिव्यांग व्यक्तींना तारेवरची करसरत करावी लागते. मात्र ठाण्यातील अंध आणि दिव्यांग व्यक्तींना बिनधास्त ओलांडता येणार आहे. गरपालिका आणि वाहतूक पोलिसांच्या वतीने ठाण्यातील तीन हात नाका येथे गील पहिला 'सुगम्य सिग्नल' उपक्रम राबवण्यात येणार आहे. हा सिग्नल मोठा याने त्याठिकाणी अंध-दिव्यांग नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी त्या ठिकाणी सवण्यात येणार आहेत. तसेच रॅम्पसाठी उभारलेल्या पिलरवर बिपर लावण्यात : आहे. या बीप आवाजाच्या संकेताने त्यांना रस्ता ओलांडणे सोपे होणार आहे. त नागरीकरणासोबतच वाहनांची संख्या वाढत आहे. तीन हात नाका, नितीन कंपनी उबरी जंक्शन, कापूरबावडी माजिवडा अशा मुख्य चौक जंक्शनवर सिग्नल यंत्रणा ती तरी पादचारी व दृष्टिहीन दिव्यांग व्यक्तींना रस्ता ओलांडताना अडचणी येतात. ठी दिव्यांग पूरक सिग्नल यंत्रणा बसवण्याचा निर्णय महापालिका आणि ठाणे शहर क शाखेच्या वतीने घेण्यात आला आहे. ठाण्यातील तीन हात नाका सिग्नलवर गील पहिली दिव्यांग पूरक (हॅडीकॅप अक्सेसेबल) सिग्नल यंत्रणा प्रायोगिक तत्त्वावर न्वित करण्यात येणार आहे. या ठिकाणी रेल्वेच्या दिव्यांग डब्याच्या धर्तीवर बिपर गार असून जिथे चढ उतार असतील तिथे छोटे रॅम्प तयार करण्यात येणार आहेत. रस्त्यावर असलेले विद्युत पोल व उभारलेल्या पिलरवर बिपर बसवण्यात येणार १. या बिपरच्या मदतीने दृष्टिहीन दिव्यांगांना रस्ता ओलांडण्यासाठी मदत होणार या ठिकाणी लावण्यात आलेल्या फलकावर ब्रेन लिपीमध्ये संदेशदेखील देण्यात आहे.

# महापालिकेने भाईंदर एसटी बस डेपो धोकादायक आणि वापरासाठी अयोग्य घोषित केला

**भाईंदर (सतीश सोनावणे) :** या प्रदेशातील राज्य परिवहन (एसटी) बसेससाठी सर्वात वर्दळीचे ठिकाण असूनही, भाईंदर (पश्चिम) येथील रेल्वे स्थानकाजवळील एकमेव नियंत्रण कक्ष-कम तिकीट बुकिंग केंद्र यांच्याकडे दुर्लक्ष आणि उदासीनतेचे खेदजनक चित्र आहे. राज्य सरकारी अधिकारी.

मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या (MBMC) मालकीची एक मजली इमारत दोन दशकांपूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (MSRTC) भाड्याने देण्यात आली होती.

छतावर सोललेले प्लॅस्टर आणि दारेशिवाय शौचालये, नियंत्रण कक्ष ज्यामध्ये तिकीट बुकिंग कार्यालय आणि ड्रायव्हर आणि कंडक्टरसाठी विश्रांती कक्ष आहे, अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे, ज्यामुळे कर्मचाऱ्यांचा आणि जवळ येणा-या प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे.





"छतावरील प्लास्टर आणि सिमेंटचे मोठे तुकडे नियमित अंतराने खाली कोसळत आहेत, ज्यामुळे गंजलेल्या प्रबलित धातूच्या पट्ट्या उघड झाल्या आहेत. वाढत्या धोक्यामुळे, आम्ही शौचालयात वेळ घालवण्यापेक्षा बसमध्ये विश्रांती घेण्यास प्राधान्य देतो." एका ड्रायव्हरने नाव न सांगण्याची विनंती केली.

शुद्ध पिण्याचे पाणी, योग्य चौकशी काउंटर, मुत्रालयांचा अभाव या मूलभूत सुविधांपासून वंचित असलेले अधिकारी अद्याप योग्य शेड किंवा स्टँड बांधू शकलेले नाहीत, त्यामुळे प्रवाशांना हवामानाचा सामना करावा लागत आहे. कडक ऊन असो वा पाऊस, मुख्य रस्त्यावरील वाहनांच्या गर्दीत प्रवाशांना स्वत:च्या रांगेत उभे राहावे लागते.

"सर्व आशा आता नवनियुक्त परिवहन मंत्री-प्रताप सरनाईक यांच्यावर आहेत, जे लगतच्या विधानसभा मतदारसंघाचे आमदार देखील आहेत आणि जुळे शहराच्या पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी सक्रिय आहेत." नियमित प्रवासी-फ्रान्सिस आल्मेडा म्हणाले. उल्लेखनीय म्हणजे, MBMC च्या सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिकृतपणे २०२० मध्ये संरचना धोकादायक आणि वापरासाठी अयोग्य म्हणून टॅग केली होती.

ए म ए स आ र टी सी ने अत्याधुनिक बस टर्मिनल उभारण्यासाठी कंट्रोल रूम आणि डेपोला लागून असलेला २ एकरचा भूखंड ताब्यात घेतल्यापासून २० वर्षांहून अधिक वर्षे झाली असली तरी बांधकामाचे काम रखडल्याने अत्यंत आवश्यक असलेली सुविधा पूर्ण झालेली नाही. २०१५ मध्ये कामाच्या थोड्या कालावधीनंतर थांबा.

नजीकच्या भविष्यात प्रवाशांकडून त्याचा वापर करण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली असली तरी, या प्लॉटचा फायदा प्रवाशांव्यतिरिक्त इतर लोकांना होत आहे ज्यांनी असुरक्षित जागेत ट्रक, खाजगी बस आणि पर्यटक वाहने यासह वाहने पार्क करणे सुरू केले आहे.



# आजचा दिवस शहीद वीर बाल दिवस म्हणून स्मरणात ठेऊया - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : शिखांचे दहावे गुरुजी गुरू गोविंद सिंग यांनी देशासाठी, आपल्या सर्वांचे रक्षण करण्यासाठी, आपल्या समाजाचे, आपल्या संस्कृतीचे, आपल्या धर्माचे रक्षण करण्यासाठी आपल्या संपूर्ण कुटुंबाचे बलिदान दिले. आजच्या दिवशी गुरू गोविंद सिंगजी यांचे दोन पुत्र साहेबजादे जोरावर सिंग आणि साहेबजादे फतेह सिंग यांच्या हौताम्यांची आठवण ठेवत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ठरविल्याप्रमाणे आजचा दिवस हा शहीद वीर बाल दिवस म्हणून स्मरणात ठेऊ, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त करून त्यांना नमन केले.

वीर बाल दिवसाचे औचित्य साधून गोरेगाव येथील गुरुद्वारामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार विद्या ठाकूर, कार्यक्रमाचे राष्ट्रीय प्रभारी शक्ती सिंग, संयोजक किरण पाटील, सह संयोजक सुरींदर सिंग पुरी, सह संयोजक राणी द्विवेदी, गुरुद्वारा कमिटीचे पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, हजारो पिढ्या आपल्याला त्यांच्याकडून प्रेरणा मिळत राहील आणि त्यांच्या हौतात्म्याची ही कहाणी आपल्या भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, ही आपली जबाबदारी आहे.

# टीएमटी चालकांची सकाळ संध्याकाळ तपासणी; चालकांसाठी सुचनांची यादी

**ठाणे (रोहित जैसवाल)** – कुर्ल्यात झालेल्या बेस्टच्या अपघातानंतर सर्वच यंत्रणा सर्तक झाली आहे. ठाणे परिवहन विभागाच्या टीएमटी बस गाड्यांमध्ये चालकांसाठी 'हे करा ' 'हे करु नका' अशा स्वरुपात सुचनांची यादी लावण्यात आली आहे. यावर मद्यपान करुन गाडी चालवू नका, सीट बेल्ट बांधा असे विविध नियमावली मांडण्यात आली आहे. तर, परिवहन विभागाच्या माध्यमातून सकाळ-संध्याकाळ चालकांची ब्रेथ ॲनालाझरच्या माध्यमातून तपासणी केली जात असल्याची माहिची ठाणे परिवहन विभागाकडून देण्यात आली. कुर्ल्यात दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या बेस्ट अपघातात निष्पाप आठ जणांचा बळी गेला. या विचित्र अपघातामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जातेय. या अपघाताच्या पार्श्वभूमीवर सर्वच शहरांमधील यंत्रणा सर्तक झालेली पाहायला मिळत आहे. ठाणे महापालिकेच्या परिवहन विभागामार्फत या अपघाताच्या पार्श्वभूमीवर विविध उपययोजना आखण्यात आल्या आहेत. टीएमटी बसगाड्यांमध्ये चालकांच्या आसनव्यवस्थेसमोर सुचनांची भल्लीमोठी यादी लावण्यात आली आहे. यात, 'हे करा' आणि 'हे करु नका' अशा स्वरुपात चालकांसाठी




नियमावली देण्यात आली आहे.

मद्यपान करुन गाडी चालवू नये, गाडी चालवताना मोबाईलवर बोलू नका, नेहमी सीट बेल्टचा वापर करावा, वेगमर्यादा पाळा अशा विविध सुचना यावर देण्यात आल्या आहेत. नियमित सकाळ -संध्याकाळ टीएमटी चालकांनी मद्यपान केले आहे की नाही याची तपासणी केली जाते. या तपासणी नंतरच त्या चालकाला बस चालवण्याची परवानगी दिली जात असल्याची माहिती ठाणे परिवहन विभागाकडून देण्यात आली.

### बस गाड्यांमध्ये लावण्यात आलेली नियमावली

**'हे करा'**

- नेहमी सीटबेल्ट लावावा
- गाडी चालवताना रस्त्यावर लक्ष ठेवावे
- वेगमर्यादा पाळा
- ट्रॅफिक सिग्नलचे पालन करा
- गाडीची नियमितपणे देखभाल करा
- आपल्या लेनमध्येच गाडी चालवा
- सुरक्षित अंतर पाळा
- उजव्या बाजूने ओव्हरटेक करावे

**'हे करु नये'**

- मद्य पिऊन गाडी चालवू नये
- इतर मोटार वाहने काय करणार आहेत याबद्दल गृहीत धरु नका
- गाडी चालवताना मोबाईलवर बोलू नका
- वाहन चालवताना लक्ष विचलिती होईल असे काही करु नका
- झोपेत असताना गाडी चालवू नका

**ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत टीएमटी चालकांची चाचणी**

ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने टीएमटी बस चालकांची तीन दिवस चाचणी घेण्यात आली. यामध्ये चालकांना वाहतुकीचे नियम समजविण्यात आले. चालक गाडी कशी चालवत आहेत, याची चाचणी सुद्धा घेण्यात आली. चालकांनी मद्यपान केले आहे की, नाही हे पाहण्यासाठी सकाळ- संध्याकाळ त्यांची तपासणी केली जाते. तपासणी झाल्यानंतर खात्री करुनच चालकाला गाडी चालविण्याची परवानगी देण्यात येते. तसेच ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत चालकांची चाचणी घेण्यात आली आहे.




# “सूरज चव्हाण या तुमच्यातल्या माणसाला”, दिग्दर्शक केदार शिंदे यांची पोस्ट चर्चेत

बिग बॉस मराठीचे पाचवे पर्व खूप गाजले. ७० दिवसांच्या प्रवासानंतर या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण ठरला. बारामतीजवळच्या मोढवे गावात एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या सूरज चव्हाणने सर्व स्पर्धकांना मागे टाकत या रिॲलिटी शोचं विजेतेपद पटकावलं. ६ ऑक्टोबर रोजी या शोचा ग्रँड फिनाले पार पडला होता. या फिनालेमध्ये कलर्स वाहिनीचे प्रोग्रामिंग हेड व मराठी दिग्दर्शक केदार शिंदे यांनी सूरज चव्हाणला शब्द दिला होता, तो शब्द त्यांनी पाळला आहे.

केदार शिंदे यांनी बिग बॉस मराठी ५ च्या ग्रँड फिनालेमध्ये सूरज चव्हाणबरोबर चित्रपट करणार असल्याची घोषणा केली होती. ‘झापुक झुपूक’ असं या चित्रपटाचं नाव असेल, असं त्यांनी सांगितलं होतं. आता ग्रँड फिनालेनंतर अडीच महिन्यांनी चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. ‘झापुक झुपूक’ चित्रपटाचा मुहूर्त सोहळा पार पडला आहे. मुहूर्त सोहळ्याचा फोटो शेअर करून खास कॅप्शन दिलं आहे.

“७ ऑक्टोबरला बिग बॉस मराठी ५ चा ग्रँड फिनाले झाला. मी आणि जिओ स्टुडिओज यांनी या सिनेमाची घोषणा केली आहे. सूरज चव्हाण या तुमच्यातल्या माणसाला घेऊन हा सिनेमा करतोय. बाईपण भारी देवा नंतरचा माझा सिनेमा. अपेक्षा तुमच्या जेवढ्या आहेत तेवढ्याच माझ्या माझ्याकडून आहेत. पण नवा डाव मांडतोय. आशीर्वाद आणि शुभेच्छा असू द्यात”, असं कॅप्शन केदार शिंदेंनी दिलं.

# ‘आई कुठे काय करते’ फेम अभिनेत्री अडकली लग्नबंधनात

‘आई कुठे काय करते’ मालिकेने काही दिवसांपूर्वीच प्रेक्षकांचा निरोप घेतला. या मालिकेतील प्रत्येक पात्राने घराघरांत लोकप्रियता मिळवली होती. यामध्ये आरोहीची भूमिका अभिनेत्री कौमुदी वलोकरने साकारली होती. कौमुदी गेल्या काही दिवसांपासून तिच्या लग्नसमारंभामुळे चर्चेत आहे. मालिकेतील जवळच्या मित्रमंडळींनी कौमुदीचं केळवण पारंपरिक पद्धतीने केलं होतं. यानंतर अभिनेत्रीच्या घरी लगीनघाई सुरू झाल्याचं पाहायला मिळालं. ग्रहमख, मेहंदी, हळद, संगीत सोहळा पार पडल्यावर अखेर आता कौमुदीने आकाशबरोबर आपली साता जन्माची गाठ बांधली आहे.



लग्न लागतानाचे फोटो शेअर करत कौमुदीने त्यावर ‘साथ सात जन्माची’ असं कॅप्शन दिलं आहे. अभिनेत्रीचा साखरपुडा गेल्या वर्षाच्या अखेरीस पार पडला होता. यानंतर कौमुदी विवाहबंधनात केव्हा अडकणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर तो क्षण आता आलेला आहे. कौमुदी आणि आकाश यांचा लग्नसोहळा थाटामाटात पडला आहे. कौमुदी वलोकरचा लग्नात पारंपरिक लूक

कौमुदीचा पती आकाश चौकसे हा कलाविश्वापासून दूर आहे. तो उच्चशिक्षित असून एज्युकेशन विषयात त्याची पीएचडी पूर्ण झालेली आहे. संगीत सोहळ्याला आकाशने कौमुदीला हटके स्टाइलमध्ये प्रपोज करत पुन्हा एकदा लग्नाची मागणी घातली होती. या गोड जोडप्याचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. लग्न लागताना कौमुदीने निळ्या रंगाची नऊवारी साडी, गुलाबी शेला अन् ब्लाऊज, पारंपरिक भरजरी दागिने, हातात हिरवा चुडा असा मराठमोळा लूक केला होता. तर, आकाशने ऑफ व्हाइट रंगाचा सदरा आणि त्यावर निळ्या रंगाचा शेला घेऊन आपल्या बायकोला मॅचिंग होईल असा लूक लग्नात केला होता. कौमुदी आणि आकाश यांच्या लग्नाच्या फोटोंवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. अश्विनी महांगडे, कृतिका देव, अभिषेक देशमुख ही कलाकार मंडळी अभिनेत्रीच्या लग्नसोहळ्याला उपस्थित होती. सध्या संपूर्ण मराठी कलाविश्वातून कौमुदीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# मराठी अभिनेत्याने दिली प्रेमाची जाहीर कबुली!

## समुद्रकिनारी केलं प्री-वेडिंग शूट; होणारी पत्नी आहे सेलिब्रिटी छाया चित्रकार



सध्या मराठी कलाविश्वातील अनेक कलाकार लग्नबंधनात अडकत असल्याचं पाहायला मिळत आहे. शाल्व-श्रेया, निखिल राजेशिर्के, रेश्मा शिंदे, कौमुदी वलोकर, किरण गायकवाड या कलाकारांच्या पाठोपाठ आता ‘कन्यादान’ मालिकेत झळकलेल्या लोकप्रिय अभिनेत्याने देखील प्रेमाची जाहीर कबुली दिली आहे.

दिवाळीत तुळशीचं लग्न पार पडल्यावर महाराष्ट्रात सर्वत्र लगीनघाईला सुरुवात होते. मराठी मनोरंजन विश्वात सुद्धा तसंच काहीसं पाहायला मिळालं. गेल्या महिन्याभरात अनेक मराठी कलाकारांनी लग्नगाठ बांधत वैयक्तिक आयुष्यात एका नव्या प्रवासाला सुरुवात केलेली आहे. यामध्ये आता आणखी एका अभिनेत्याचं नाव जोडलं जाणार आहे. ‘कन्यादान’ मालिकेत झळकलेला अभिनेता देवेश काळे लवकरच बोहल्यावर चढणार आहे. सोशल मीडियावर होणाऱ्या पत्नीसह रोमँटिक फोटो शेअर करत देवेशने प्रेमाची जाहीर कबुली दिली आहे. “प्रवास तिथून सुरू होतो जिथे मन स्थिर होतं” असं कॅप्शन देत देवेशने आपल्या होणाऱ्या पत्नीचा हातात हात घेऊन पाठमोरा फोटो सर्वात आधी सोशल मीडियावर शेअर केला. या फोटोवर अनेकांनी, “कोण आहे रे ती?” अशा कमेंट्स केल्या होत्या. यानंतर अभिनेत्याने होणाऱ्या पत्नीसह रोमँटिक फोटो शेअर करत प्रेमाची कबुली दिली आहे. अभिनेता देवेश काळे याची होणारी पत्नी सारिका भणगे ही प्रसिद्ध सेलिब्रिटी छाया चित्रकार आहे. त्यामुळे या दोघांच्या फोटोंवर सौरभ चौघुले, श्रेया बुगडे, चेतन गुरव, मधुरा देशपांडे, ऋतुजा कुलकर्णी या सगळ्या कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. देवेश आणि सारिका यांनी समुद्रकिनारी सुंदर असं प्री-वेडिंग शूट केलं आहे. यावेळी दोघांनीही Twinning केल्याचं पाहायला मिळालं. अभिनेत्याने पांढऱ्या रंगाचा शर्ट तर, सारिकाने पांढऱ्या रंगाचा सुंदर असा वनपीस घातल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, देवेश काळेच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर ‘कन्यादान’ या मालिकेसह देवेश ‘पुष्पक विमान’ आणि ‘बांबू’ या चित्रपटांच्या टीमसह देखील जोडला गेला होता. अभिनेत्याने भटकंतीची सुद्धा प्रचंड आवड असल्याचं त्याचं इन्स्टाग्राम प्रोफाइल पाहून लक्षात येतं.

# लोकलने प्रवास करणाऱ्या प्राजक्ता कोळी या मराठमोळ्या अभिनेत्रीला तुम्ही ओळखलंत का? सीरिज नेटफ्लिक्सवर आहे ट्रेंडिंग



सिनेविश्वातील अनेक कलाकार वेळेत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरतात. बरेच कलाकार मुंबईची लाइफलाइन असलेल्या लोकलने किंवा मेट्रोने प्रवास करतात. नेटफ्लिक्सवर सध्या ट्रेंडिंग असलेल्या सीरिजच्या मराठमोळ्या अभिनेत्रीने लोकलमध्ये प्रवास करतानाचा एक व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.

ही अभिनेत्री नुकतीच लेखिका झाली असून तिचं पहिलं पुस्तक प्रकाशित झालं आहे. इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर केल्यानंतर रिकामी लोकल पाहून चाहत्यांनी तिला प्रश्न विचारले आहेत. तसेच तिचा साधेपणापाहून चाहते तिचं कौतुक करत आहे. तर फोटोतील या अभिनेत्रीला तुम्ही ओळखलंत का?

फोटोतील अभिनेत्री ही मराठमोळी प्राजक्ता कोळी आहे. प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यात ती लोकलमध्ये बसलेली दिसत आहे. तर दुसऱ्या व्हिडीओमध्ये ती लोकलच्या दारात उभी राहतेय. प्राजक्ताने प्रवासात हिरव्या रंगाचा चिकनकारी कुर्ता घातला आहे. प्राजक्ताने ‘मुंबई’ असं लिहून त्याबरोबर कॅप्शनमध्ये लाल रंगाचा हार्ट इमोजी वापरला आहे. प्राजक्ताच्या या व्हिडीओवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत.

प्राजक्ता कोळी सध्या तिच्या ‘मिसमॅच्ड’ सीरिजच्या तिसऱ्या सीझनमुळे चर्चेत आहे. ही रोमँटिक ड्रामा सीरिज नेटफ्लिक्सवर ट्रेंड करत आहे. आधीच्या दोन सीझनप्रमाणेच तिसऱ्या सीझनलादेखील प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. १३ डिसेंबर रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या ‘मिसमॅच्ड’च्या तिसऱ्या सीझनमध्ये प्राजक्ता कोळीबरोबर कलाकारांची मांदियाळी आहे. रोहित सराफ, रणविजय सिन्हा, विद्या माळवदे, तारुक रैना, एहसास चन्ना, मुस्कान जाफरी, अभिनव शर्मा, दिपन्निता शर्मा, लॉरेन रॉबिन्सन, अक्षत सिंह हे कलाकार आहेत.

# आधी ख्रिसमसच्या शुभेच्छा, मग फ्लाइंग किस...; चिमुकली राहा कपूर नेमकं काय म्हणाली?

२५ डिसेंबर २०२४ म्हणजेच, आजपासून बरोबर एक वर्षापूर्वी रणबीर कपूर आणि आलिया भट्ट या सेलिब्रिटी जोडप्याने आपल्या लाडक्या लेकीचा चेहरा माध्यमांसमोर रिव्हिल केला होता. त्या दिवसापासून इंटरनेटवर सर्वत्र राहाचे फोटो, व्हिडीओ व्हायरल होऊ लागले होते. गेल्यावर्षी ख्रिसमसनंतर, यंदा थेट मार्चमध्ये जामनगरला अंबानींच्या प्री-वेडिंग सोहळ्यात नेटकऱ्यांनी राहाची झलक पाहायला मिळाली होती. या वर्षभरात राहा सर्वांची फेव्हरेट स्टारकिड म्हणून ओळखली जाऊ लागली आहे.



गेल्यावर्षी ख्रिसमसच्या दिवशी राहाच्या आई-बाबांनी तिची ओळख संपूर्ण जगाला करून दिली होती. आज बरोबर एक वर्षांनी या चिमुकल्या राहाने ख्रिसमसच्या दिवशी माध्यमांसमोर येऊन उपस्थित सगळ्या पापाराझींना चक्क ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या आहेत. इतकंच नाही तर, लाडक्या बाबाच्या कडेवर परत जात असताना... तिला सर्वांनी ‘हाय राहा...हाय राहा’ असा आवाज दिला. हा आवाज ऐकताच, आलियाच्या लेकीने सर्वांना प्रेमळ अंदाजात ‘हाय’ करून गोड अशी फ्लाइंग किस देखील दिली. राहाचे हे गोड व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र तुफान व्हायरल होत आहेत. तिचा हा क्युट अंदाज पाहून सगळे जण भारावून गेले आहेत. सुरुवातीला राहाची आई अभिनेत्री आलिया भट्ट पापाराझींसमोर आली. तिने सर्वांना, “शांत बसा... नाहीतर राहा घाबरेल” अशी विनंती केली. यानंतर लाडक्या लेकीला कडेवर घेऊन रणबीर माध्यमांसमोर आला. राहाची एन्ट्री होताच ती पटकन ‘हाय मेरी ख्रिसमस’ असं म्हणाली. लेकीचे बोबडे बोल ऐकून आलिया-रणबीर देखील भारावून गेले होते. यानंतर सर्वांना अभिवादन करून कपूर कुटुंबीय पार्टीला निघाले. तेव्हा सगळेजण राहाला आवाज देऊ लागले. यादरम्यान, गोंडस राहाने सर्वांना ‘हाय’ करत फ्लाइंग किस दिल्याचं पाहायला मिळालं. नेटक्यांनी या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. राहाचे बोबडे बोल ऐकून सर्वजण भारावून गेल्याचं कमेंट्स वाचून स्पष्ट होत आहे. दरम्यान, राहाचा जन्म ६ नोव्हेंबर २०२२ मध्ये झाला.




**मेष** – कामाच्या ठिकाणी तुमच्या कामगिरीने सहकारी प्रभावित होतील. इतरांशी सौहार्दपूर्ण संबंध राहतील. कठोर शब्द वापरू नका.

**वृषभ** – तुमच्यासमोर एखादे आव्हान येऊ शकते. आपल्याला व्यवसायात पुढे जाण्याची संधी मिळेल. मानसिक शांतता लाभेल.

**मिथुन** – एखाद्या चांगल्या ठिकाणी भेट देण्याची योजना आखू शकता. जुना काळ विसरून पुढे गेल्यास अपेक्षित यश मिळेल.

**कर्क** – कोणताही वाद लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. व्यवसायात सुधारणा होईल. ओळखीची व्यक्ती भेटेल.

**सिंह** – उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळाल्याने आर्थिक समस्या दूर होईल. सर्जनशील कार्य करण्याची संधी मिळेल. आरोग्य ठीक राहील.

**कन्या** – तुमची प्रतिमा अधिक मजबूत होईल. काही माहिती गोपनीय ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नोकरीत बेफिकीर राहू नका.

**तूळ** – तुमच्या दैनंदिन दिनचर्येत काही बदल करू शकता. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. आपल्या कामातील चुका टाळा.

**वृश्चिक** – मनावरील दडपण दूर झाल्याने हलके वाटेल. आपल्या अपेक्षा संतुलित ठेवाव्यात. महत्त्वाचे काम सहजतेने पूर्ण कराल.

**धनु** – वडीलधाऱ्यांकडून सहकार्य मिळेल. नवीन बदलासाठी स्वतःला तयार करा. ओळखीच्या लोकांसोबत वेळ घालवाल.

**मकर** – मालमत्तेच्या किंवा पैशांच्या व्यवहारात अत्यंत सावधगिरी बाळगा. नोकरीच्या ठिकाणी तुमच्या कामाचे कौतुक होईल.

**कुंभ** – व्यवसायात चांगला फायदा होईल. कठोर परिश्रमाने आपली अवघड कामेही सहज पूर्ण होतील. आरोग्य चांगले राहील.

**मीन** – बोलण्याची कला तुम्हाला कोणत्याही क्षेत्रात यशोशिखरावर नेण्यासाठी उपयुक्त ठरेल. जोडीदारासोबत वेळ घालवाल.

# मुंबईतील अर्ध्याहून अधिक बेकऱ्या अनधिकृत

## प्रदूषण नियंत्रणासाठी पालिकेची ६५० बेकऱ्यांना नोटीस

**मुंबई (राकेश गायकवाड) -** पावसाळा संपल्यानंतर मुंबईतील प्रदूषणात वाढ होताना दिसते. विशेष म्हणजे हे चित्र दरवर्षी पाहायला मिळतं. त्यानंतर महापालिकेलाही जाग येते आणि नियम जारी केले जातात. परंतु ते नियमही अनेक कंपन्या जवळपास धाब्यावर बसवतात. परंतु यंदा मात्र पालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, मुंबईत प्रदूषणासाठी कारणीभूत ठरणाऱ्या बांधकामांवर पालिकेने दंडात्मक कारवाई केलीय. प्रदूषण करणाऱ्यांविरोधात कारवाई करत पालिकेने एकाच दिवसात तब्बल ५६ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल केलाय. महापालिकेच्या माहितीनुसार, मुंबईत अनेक पुनर्विकासाची कामे सुरू आहेत. त्यातून वातावरणात मिसळणारी धूळ, गाड्यांमधून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे प्रदूषणात वाढ होते. मात्र, आता महापालिकेने बेकरी व्यावसायिकांनादेखील



प्रदूषणासाठी कारणीभूत ठरवले असून, तब्बल ६५० बेकरी व्यावसायिकांना पालिकेने यासंदर्भात नोटिसा पाठवल्यात.

महापालिकेच्या म्हणण्यानुसार, बेकरी भट्ट्या हेदेखील वायू प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे. मुंबईतील ४७ टक्के बेकरी व्यावसायिक भट्टीसाठी भंगार लाकूड इंधन म्हणून वापरतात. त्यातून निघणाऱ्या धुराचा लोकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. यात प्रामुख्याने बांधकामात वापरलेले लाकूड, फर्निचर बनवणाऱ्यांकडून मिळालेले उरलेले लाकूड, जुने तुटलेले फर्निचर, सॅनमाईका-प्लायबोर्ड आदींचा वापर केला जातो. त्यामुळे यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषित वायू आणि धूर वातावरणात मिसळतो, त्याचा मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

छोट्या बेकरीमध्ये दररोज अंदाजे ५० ते १०० किलो लाकूड इंधन म्हणून वापरले जाते. तर मोठ्या बेकऱ्यांमध्ये अंदाजे २५० ते ३०० किलो लाकूड वापरले जाते. २० किलो मैद्याचा पाव तयार करण्यासाठी साधारण ५ किलो लाकडाची गरज भासते. भंगारातील निरुपयोगी लाकूड जाळल्याने त्यातून मिथेन, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड, अस्थिर सेंद्रिय संयुगे यांसारखे आरोग्यास हानिकारक वायू बाहेर पडतात. त्यातून खोकला अन् श्वासनाचे आजार, अस्थमा असे गंभीर आजारदेखील होऊ शकतात. तसेच या धुरामुळे काही सूक्ष्मकण आपल्या फुफ्फुसांमध्ये अगदी आतपर्यंतदेखील पोहोचतात आणि त्याने कर्करोग, रक्तवाहिन्याशी संबंधित आजारदेखील होऊ शकतात, अशी माहिती पालिकेने दिली आहे.

बाजारात जळाऊ लाकडं उपलब्ध असताना बेकरीत भंगारातील लाकडांचा वापर का केला जातो? असा प्रश्न आम्ही मुंबईतील एका बेकरी व्यावसायिकाला विचारला. नाव न सांगण्याच्या अटीवरून त्यानं सांगितलं की, इतर साधनांच्या तुलनेत भंगाराचे लाकूड स्वस्त पडते. बाजारात आज इंधन लाकडाची किंमत १५ रुपये किलो आहे. तर भंगार लाकडाची किंमत ५ रुपये किलो आहे. पालिकेने गॅस सिलिंडर आणि सीएनजीचे पर्यायदेखील दिलेत. पण व्यावसायिक सिलिंडर वापरल्यास त्याची किंमत ९२.०५ रुपये प्रति किलो जाते आणि CNG वापरल्यास त्याची किंमत प्रति किलो ५८.७८ रुपयांपर्यंत जाते. तेच आम्ही इलेक्ट्रिक भट्ट्या वापरल्यास प्रति युनिट १२ रुपये इतका खर्च येतो. या तुलनेत भंगारातील लाकूड परवडते.

# जहाजावरील क्षेपणास्त्राच्या हल्ल्यातील सागरी कामगार, सुरक्षितपणे मुंबईत परतले !




**मुंबई (विशाल कारंडे) -** यमनजवळ यंदा झालेल्या एका भीषण घटनेनंतर एसा स्टार जहाजावरील सर्व भारतीय सागरी कामगार सुरक्षितपणे मुंबईत परतले आहेत. ५ डिसेंबर २०२४ रोजी या जहाजावर क्षेपणास्त्र हल्ला झाला होता, ज्यामुळे रेड सी प्रदेशातील तणाव वाढल्याचे दिसून आले. सागरी कामगारांना यशस्वीरीत्या सुरक्षितपणे आणल्याचे श्रेय नॅशनल युनियन सिफेरर्स ऑफ इंडिया (NUSI) आणि आंतरराष्ट्रीय वाहतूक कामगार महासंघ (ITF) यांच्या नेतृत्वाखालील धाडसी व्यवस्थापकीय प्रयत्नांना जाते. या संस्थांनी सागरी कामगारांना त्यांच्या कुटुंबियांपर्यंत सुरक्षित पोहोचवण्यासाठी अहोरात्र काम केले. आपल्या सागरी कामगारांना सुरक्षितपणे परत आणले, ही नुसीसाठी सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे," असे नुसीचे जनरल सेक्रेटरी व खजिनदार मिलिंद कांदळगावकर यांनी सांगितले.

SPORT




# 'Father Of...', Sam Konstas' Wikipedia Page Altered After Fiery On-Field Clash With Virat Kohli

**Melbourne** - The Melbourne Cricket Ground (MCG) witnessed a scintillating spectacle as 19-year-old Australian debutant Sam Konstas lit up the Boxing Day Test against India. With his fearless batting and audacious exchanges on the field, Konstas not only showcased immense potential but also became the centerpiece of an intriguing social media saga.

**Konstas' Dazzling Debut**

Stepping onto the field as an opener for Australia, Konstas exhibited an aggressive intent from the outset. Facing the formidable Jasprit Bumrah, the young batter fearlessly attacked, scoring 34 runs off the Indian spearhead, including a blistering 18-run over. His daring strokeplay, a mix of unconventional scoops and classic pulls, culminated in a quickfire 60 off 65 balls. This innings marked the third-fastest half-century by an Australian Test debutant, setting the tone for a commanding Australian start at 112/1 by lunch.

**Drama Unfolds: Konstas vs. Kohli**

The match wasn't without its share of theatrics. A shoulder bump between Virat Kohli and Konstas sparked a heated exchange, drawing widespread attention. The incident, coupled with verbal duels involving pacer Mohammed Siraj, added a layer of intensity to an already thrilling contest. Despite the tension, Konstas remained composed, earning applause from the MCG crowd for his fearless demeanor.

However, this physical altercation could have repercussions for Kohli. The International Cricket Council (ICC) prohibits deliberate or reckless physical contact. If found guilty of intentionally bumping into Konstas, Kohli risks fines or even a match ban.

**Wikipedia Edits Go Viral**

Konstas' on-field heroics had an unexpected ripple effect online. Fans, enthralled by his dominance and fiery exchanges, took to Wikipedia to humorously modify his profile. Initially labeled the "Father of Jasprit Bumrah" for his aggressive batting against the Indian pacer, his page was later altered to declare him the "Father of Virat Kohli" following their confrontation.

While Wikipedia moderators quickly reverted these edits, the screenshots had already gone viral, sparking a mix of humor and outrage across social media platforms. The incident highlighted Konstas' rapid rise to fame, with memes and posts celebrating his fearless approach to cricket.

**Turning Point: Jadeja Strikes Back**

Despite his impressive innings, Konstas' time at the crease ended when Ravindra Jadeja trapped him lbw shortly after the second drinks break. This wicket offered a lifeline to the Indian team, which was struggling to find its footing. Jasprit Bumrah soon dismissed Usman Khawaja, giving India a glimmer of hope at 176/2.

**The Stakes of the Boxing Day Test**

As the Boxing Day Test progresses, the stakes remain high. A victory in this match would secure a series draw for the winner, making every session crucial. India, despite their early setbacks, will look to regroup and capitalize on the breakthroughs achieved in the second session.

**The Making of a Star**

Sam Konstas' debut performance has left an indelible mark on the cricketing world. Beyond the runs scored and the controversies stirred, the young batter's poise under pressure and ability to take on world-class bowlers have made him a sensation. His journey from debutant to viral star epitomizes the unpredictability and excitement of cricket.

With his fearless approach and undeniable talent, Konstas has set the stage for a promising career. Whether he will continue to thrive against top-tier opponents remains to be seen, but one thing is certain: the cricketing world will be watching.

# Rohit Sharma confronts Marnus Labuschagne over pitch running repeatedly

**NEW DELHI:** In a high-tension encounter on the opening day of the fourth Test of the Border-Gavaskar Trophy at the Melbourne Cricket Ground, India captain Rohit Sharma confronted Australian batter Marnus Labuschagne over running on the pitch while taking runs.

With the series tied at 1-1, the stakes in this decisive Test for a spot in the ICC World Test Championship final are immense, and emotions ran high.

The incident occurred as Rohit expressed his dissatisfaction with Labuschagne and debutant Sam Konstas repeatedly running on the danger area of the pitch, a zone critical for spinners in



later stages. Rohit's animated discussion with Labuschagne caught the attention of fans and commentators alike.

Former India all-rounder and commentator Irfan Pathan explained the situation, saying, "Rohit Sharma yeh bata rahe hain ki jab aap bhaag rahe hain toh aap pitch mein bhaag rahe hain."

Legendary cricketer Sunil Gavaskar echoed Pathan's observations, adding, "Sam Konstas bhi. Sam Konstas ko aapne dekha, toh woh seedha hi pitch pe bhaagta tha. Aur usko kuch kisi ne bola nahi."

Gavaskar further remarked on the umpires' inaction, stating, "Aur umpire bas wahaan dekh rahe hain. Jo baatchit chal rahi hai Rohit Sharma aur Labuschagne ke beech, toh dekho umpire bas dekh rahe hain."

Virat Kohli, fielding in the slip cordon, was also seen expressing his displeasure about the issue. Following the conversation, Labuschagne appeared to agree with Sharma, nodding in acknowledgment. However, his resistance to India's attack was short-lived as Washington Sundar dismissed him for 72 off 145 balls, an innings that included seven boundaries. The dramatic first day has set the stage for an intense battle, with every moment scrutinized in this crucial Test match.

# Did Xavier Worthy get called for penalty over Christmas celebration?

**Kansas** - Kansas City Chiefs rookie Xavier Worthy made a memorable debut at Acrisure Stadium, quickly making his presence felt with a spectacular touchdown. However, his festive celebration soon stole the spotlight, sparking controversy. After catching a pass from Patrick Mahomes and sprinting into the end zone, Worthy and teammate Hollywood Brown staged a playful Grinch-inspired act. But the fun quickly turned into a penalty, leaving fans and officials puzzled. Here's why that celebration led to a flag and what it meant for the game.



Kansas City Chiefs rookie wide receiver Xavier Worthy wasted no time making an impact at Acrisure Stadium, but his bold move had a holiday twist that left fans and officials scratching their heads. After the Chiefs defense quickly shut down the Pittsburgh Steelers' opening drive, Patrick Mahomes and his offense took full advantage of the prime field position.

Inside the red zone, Worthy lined up in the backfield before sprinting out to the left flat, where he was wide open. Mahomes delivered a quick pass, and Worthy turned on the afterburners, darting into the end zone for a swift touchdown. But what happened next? His celebration, of course.

Worthy and fellow wide receiver Hollywood Brown pulled off a cheeky Grinch-inspired act, with Worthy pretending to throw presents into a bag held by Brown.

# Pickleball Kingdom Announces 15 New Indoor Facilities In Florida

**Florida** - Pickleball Kingdom has made a mega announcement and they are set to open 15 new indoor pickleball facilities in the East Coast of Florida. They will offer climate-controlled indoor courts, lounge areas and training programs. The indoor courts will attract more fans to the sport as those who are reluctant to play in extreme heat or cold will get a platform to try their hand at pickleball without worrying about the weather.

"We are thrilled to introduce Pickleball Kingdom to the vibrant communities of the East Coast of Florida through our multi-location deal. The pickleball community in Florida is one of the greatest," Ace Rodrigues, Founder and CEO of Pickleball Kingdom, said.

Pickleball is the fastest-growing sport in the US and many tennis players have turned pro pickleball players. Novak Djokovic, Naomi Osaka and several other tennis stars have



played the sport. Pickleball's increasing popularity can see it become more popular than tennis in the years to come.

**Australian Open to embrace Pickleball**

Amid pickleball's soaring popularity across the globe, the Australian Open is set to embrace pickleball. The Grand Slam will stage AO Pickleball Slam on the final weekend of the tournament.

"Pickleball is a sport for everyone, and its rapid growth globally "highlights its unique ability to connect people of all ages and backgrounds. By bringing pickleball to the AO, we're embracing the future of racket sports and providing an incredible experience for players and fans alike," Tom Larner, Tennis Australia's chief tennis officer, said. The tournament will have a prize money of $100,000. The matches will be played at Melbourne Park's 3 Court from January 24 to 26.

# मिळकतखार अनधिकृत भराव प्रकरणात प्रांत अधिका-यांचे स्थळ पहाणीचे आदेश

## सन २००५ पासून गुगल ई-मेज, एमआरसॅक कडील नकाशाचे अवलोकन करुन होणार कारवाई

● अलिबाग, दिगंबर जाधव :

अलिबाग तालुक्यातील मिळकतखार अनधिकृत भराव प्रकरणी प्रशासनाने आता ठोस कारवाई करण्याची भूमिका घेतली असून अलिबागचे प्रभारी प्रांत अधिकारी श्रीकांत गायकवाड यांनी या प्रकरणात कांदळवनाची प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दि.१७/०९/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार या जागेची स्थळ पहाणी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश वन विभागाला दिले आहेत.

तक्रारदार जगदीश नाना म्हात्रे, रा. आवळीपाडा. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी अर्जात नमूद केलेल्या जागेबाबत प्राप्त तक्रारी नुसार प्रश्नाधिन मिळकतींची दिनांक २६/२१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता संयुक्त स्थळपहाणी करून व मोजमापे घेवून प्रस्तुत ठिकाणी कांदळवन तोड झाली आहे अगर कसे ? याबाबत पडताळणी करुन व सन २००५ पासून गुगल ई-मेज, एमआरसॅक कडील नकाशाचे अवलोकन करुन तसेच वस्तुस्थितीबाबतचे फोटोग्राफ (अक्षांश व रेखांश सह) सर्व संबंधीत यंत्रणांनी एकत्रीत स्वाक्षरीचा अहवाल (अलिबाग व मुरुड तालुका स्तरावर गठीत केलेली समिती) चे सचिव तथा परिक्षेत्र वन अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयास तात्काळ सादर करावा. तसेच सचिव तथा परिक्षेत्र वन अधिकारी अलिबाग यांनी परिपूर्ण अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट कारणमीमांसेसह कांदळवनाची तोड झाली अथवा नाही याबाबत सुस्पष्ट अहवालात नमूद करणेत यावे. तसेच आपले अहवालात (संदीग्धता) राहणार नाही याची दक्षता घ्यावी. असे आदेश



प्रभारी वन जमाबंदी अधिकारी तथा प्रभारी उप विभागीय अधिकारी अलिबाग श्रीकांत गायकवाड यांनी पारित केले आहेत.

तक्रारदार जगदीश नाना म्हात्रे, रा. आवळीपाडा. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी मौजे मिळकतखार गट नं. ३९/१, ३९/२, ६९/१. ३४/१, ३४/३, ३७, ८०, ७८, ७४/२, ७०, ७७, ७१, ७२, ६३. ६९/२. ४८. ४९, ३९/४, ४७/२. ५०, ५१,५३, ६०, ५६, ४४, ४५, ४७/१,६८, ३९/३ या मिळकतींमध्ये कांदळवन युक्त सी. आर.झेड च्या तरतुदी लागू असलेल्या जमिन मिळकतीवर झालेल्या अनधिकृत भरावाबाबत वन विभागाकडे तक्रार केली होती. प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्याबरोबर ४८ तासांच्या आत स्थळ पहाणी करुन कांदळवन तोड झाल्याचे निदर्शनास आल्यास उपविभागीय अधिकारी यांनी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ मधील १५ (१) नुसार १ महिन्याच्या आत कोर्टात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे प्रांतांच्या आदेशात नमूद केले आहे.

या आदेशान्वये तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी अलिबाग हे अध्यक्ष, परिक्षेत्र वन अधिकारी हे सदस्य सचिव व तहसिलदार, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्याधिकारी, नगर परिषद, पोलीस निरीक्षक/ सहा. पोलीस निरीक्षक, पो. ठाणे व मंडळ अधिकारी यांची सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

■ रायगड जिल्हयात सागरी किनाऱ्यावरील क्षेत्रावर कांदळवनाची प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दि.१७/०९/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सागरी किनारपट्टीवर असलेल्या तालुक्यासाठी तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरीय समिती स्थापन करणेबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी निर्देश दिलेले आहेत. सदर अनुषंगाने रायगड जिल्हयातील कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जिल्हा स्तरावर व कांदळवन क्षेत्र असलेल्या (अलिबाग व मुरुड) तालुक्यामध्ये तालुका स्तरावर सदस्यांची समिती गठीत केलेली असून सदर आदेशामध्ये समितीची कार्य विषद केलेली आहेत.

# जम्मू-काश्मीरमध्ये सैन्य दलाचं वाहन दरीत कोसळलं; साताऱ्याच्या जवानाला वीरमरण

● सातारा, दिगंबर जाधव:

जम्मू-काश्मीरमधील पूंछ भागातील नियंत्रण रेषेजवळ बलनोई परिसरात मंगळवारी २४ डिसेंबरला सायंकाळी भारतीय सैन्य दलाचं वाहन खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ५ जवानांना वीरमरण आलं. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील कामेरी गावचे सुपुत्र शुभम घाडगे यांचा समावेश आहे. शुभम घाडगे हे ११ मराठा रेजिमेंटमध्ये कार्यरत होते. या घटनेमुळं कामेरी गावावर शोककळा पसरली आहे.

कामेरी गावचे सुपूत्र शुभम घाडगे यांचं प्राथमिक शिक्षण



जिल्हा परिषद शाळेत झालं होतं. महाविद्यालयीन शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेज अपशिंगे मिलिटरी इथं पूर्ण करून ते भारतीय सैन्य दलात भरती झाले. कामेरी, अपशिंगे मिलिटरी या परिसरातील अनेक जवान भारतीय सैन्य दलात सेवा बजावत आहेत. शुभम घाडगे यांना वीरमरण आल्याची बातमी समजताच कामेरी परिसरावर शोककळा पसरली.

गावचे सुपूत्र शुभम घाडगे यांना जम्मू काश्मीरमध्ये वीरमरण आल्यानं कामेरी गाव सुन्न झालं आहे. शुभम यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, मुलगी, भाऊ, असा परिवार आहे. आता ग्रामस्थांना वीर जवानाच्या पार्थिवाची प्रतिक्षा आहे. लवकरच त्यांचं पार्थिव गावी दाखल होईल, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.

एकूण १८ जवान प्रवास करत असलेलं सैन्य दलाचं वाहन मंगळवारी खोल दरीत कोसळलं. या दुर्घटनेत ११ मराठा रेजिमेंटचे ६ जवान गंभीर जखमी झाले.

# मंदिरांना सरकारी नियंत्रणातून मुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र टेंपल ट्रस्ट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार

● शिर्डी, अभिजित येरल्लू :

महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेने राज्यातील प्रत्येक मंदिरासाठी सुरक्षा समिती स्थापन करण्याचा ठराव मंजूर केला. दोन दिवसीय परिषदेत मंदिर मालमत्ता वाचवण्यासाठी जमीन बळकावणे विरोधी कायद्याची अंमलबजावणी करणे, काशी-मथुरेतील न्यायालयीन खटले जलदगतीने चालवणे आणि राज्यातील सर्व मंदिरे सरकारी नियंत्रणातून मुक्त करणे यासह एकूण दहा ठराव मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र मंदिर महासंघ, श्री जीवदानी देवी संस्थान, श्री




ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा, आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या महाराष्ट्र मंदिर विश्वस्त परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. श्रीडीच्या श्री साई पालखी निवारा येथे आयोजित या परिषदेत महाराष्ट्रातील ८७५ हून अधिक मंदिर प्रतिनिधी सहभागी झाले होते. दोन दिवस चाललेल्या या परिषदेत एकूण १० ठराव मंजूर करण्यात आले असून मंदिर महासंघाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपली मागणी मांडणार असल्याचे जाहीर केले आहे. या उपक्रमासाठी विशेष सहकार्य करण्याचे आश्वासन राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी दिले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत विविध मंदिर समस्यांवर चर्चा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, गटचर्चा यांचा समावेश होता. 'सनातन धर्म संवर्धनासाठी मंदिरांचे केंद्रांमध्ये रूपांतर करणे,' 'वक्फ कायद्यांतर्गत मंदिरांच्या जमिनींवरील अतिक्रमणावर उपाय,' 'मंदिरांमधील ड्रेस कोड' आणि 'धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि मंदिरे यांच्यातील समन्वय' या विषयांचा समावेश होता. या चर्चेच्या आधारे, परिषदेने अनेक ठराव पारित केले, ज्यात मंदिरे आणि त्यांच्या जमिनींवरील अतिक्रमणांच्या विरोधात साप्ताहिक सामूहिक आरती आयोजित करणे; काशी आणि मथुरा तीर्थक्षेत्रांची न्यायालयीन प्रकरणे जलदगतीने निकाली काढणे, राज्यातील सर्व मंदिरे सरकारी नियंत्रणातून मुक्त करून भक्तांवर सोपवणे. मंदिरांमध्ये भाविकांनी देऊ केलेला निधी सरकारने विकास प्रकल्पांसाठी वापरला जाऊ नये, धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून मंदिरांच्या देणगीची विनंती करणारे बेकायदेशीर सरकारी निर्देश थांबवणे आणि मंदिराचा निधी केवळ धार्मिक कारणांसाठी वापरला जाईल याची खात्री करणे.

# ६ वर्षीय चिमुरड्याच्या छातीवरुन कार चालवत फरार झालेल्या चालकाला पोलिसांनी उचललं




● वसई, सुचिता सोनावणे :

वसईतील वाळीव भागात बुधवारी (दि.२६) सकाळी घडलेल्या दुर्दैवी घटनेने सर्वांनाच हादरवून सोडले होते. एका सहा वर्षाच्या लहान मुलाच्या छातीवरून टी परमिट वाहन चालवून फरार झालेल्या चालकाला वाळीव पोलिसांनी अटक केली आहे. कफील अहमद असे या चालकाचे नाव असून, तो गोरेगाव पूर्वेकडील राहणार आहे. अपघाताचे दृश्य सीसीटीव्हीत कैद झाली होती. वसई पूर्वेच्या शिव भिम नगर, नाईकपाडा येथे बुधवारी सकाळी १०.२१ वाजता ही घटना घडली. एम.एच. ०१ ई एम ३२४५ क्रमांकाच्या कारसाठी ओला ॲपवरून बुकिंग करण्यात आले होते. गाडी प्रवासी घेण्यासाठी येताच पाच वर्षांचा राघवकुमार चव्हाण उर्फ छोटू गाडीच्या समोर मोकळ्या जागेत मातीत खेळत होता.

## अपघातानंतर कार चालकाचे पलायन

■ अपघातानंतर चालकाने घटनास्थळावरून फरार होण्याचा प्रयत्न केला. स्थानिकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र चालकाने कोणतेही ऐकले नाही. ओला बुक करणाऱ्या प्रवाशालाही संपर्क साधण्यात आला, परंतु त्याने कार चालकासोबत येण्याचे सांगत मोबाईल स्विच ऑफ केला.

# उरणच्या पाणजे पाणथळीवर परदेशी पाहुण्यांचे आगमन



● उरण, भावना जैन :

बुधवारी पाणजे येथील २८९ हेक्टर पाणथळीवर यावर्षीही परदेशी पक्षी असलेल्या फ्लेमिंगोचे आगमन सुरू झाले आहे. त्यामुळे या पाणथळीच्या संवर्धनासाठी न्यायालयीन आणि वैधानिक पातळीवर लढणाऱ्या पर्यावरणवाद्यांनी आनंद व्यक्त केला आहे. तर पक्षी निरीक्षकानी समाधान व्यक्त केले आहे. उरणमधील सर्वात मोठया पाणथळीचे बहुतेक वेळा जलक्षेत्र कोरडे करण्यासाठी आंतरभरतीचे पाणी अडवले जात असल्याने पर्यावरणवादी संस्था नॅटकनेक्ट फाऊंडेशनने अनेकदा आक्षेप नोंदविले आहेत. तर पर्यावरणवाद्यांना दिलासा देण्यासाठी, राज्य सरकारने अलीकडेच चेन्नई येथील संशोधन संस्थेने सूचिबद्ध केलेल्या आणि दस्तऐवजीकरण केलेल्या ५६४ पाणथळ जमिनींपैकी एक म्हणून पाणजेची नोंद यादीत केली आहे. पाणजे येथील पाण्याचे इनलेट कधीही गुदमरणार नाहीत याची काळजी घेण्याची जबाबदारी आता सिडको, रायगड जिल्हाधिकाऱ्यांची आहे.

## न्यायालयीन लढाई

पर्यावरणाच्या दृष्टीने नाजूक उरणमधील पाणथळ जमीन आणि जैवविविधता वाचवण्यासाठी वनशक्ती आणि सागर शक्ती मुंबई उच्च न्यायालयात कायदेशीर लढा देत आहेत. पर्यावरणवाद्यांसाठी वादाचा मुद्दा हा आहे की वेटलँड NMSEZ (आता NMI-IA) ला चुकीच्या पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे ज्यामध्ये सिडको स्वतः २६ टक्के भागधारक असल्याचे मत नॅटकनेक्टचे संचालक बी एन कुमार यांनी व्यक्त केले आहे. तर फ्लेमिंगो चे आगमन हे नव्या हंगामातील सुखद अनुभव असल्याचे म्हटले आहे.

# विक्री हमी दरवाढीअभावी साखर उद्योग अडचणीत

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :



मागील हंगामापाठोपाठ चालू गळीत हंगामातही देशातील साखरेच्या उत्पादनात तब्बल ७५ लाख टनांची घट येण्याची शक्यता असतानाही साखरेच्या विक्री हमी दरात वाढ होत नसल्याने या उद्योगापुढील आर्थिक अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. एकीकडे उसाच्या खरेदी दरामध्ये झालेली वाढ, उत्पादन खर्चातील वाढ आणि दुसरीकडे साखरेच्या विक्री हमी दरातील 'जैसे थे' स्थितीमुळे साखर कारखानदारी चालवणे दिवसेंदिवस अवघड होणार आहे.

देशातील साखर उद्योग मोठा आहे. महाराष्ट्राचे ग्रामीण भागाचे अर्थकारण, राजकारण उसाभोवतीच फिरत असते. देशात सन २०१९-२० या हंगामात ४०५ लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते. गेल्या वर्षी मात्र यामध्ये तब्बल ७५ लाख टनांची घट झाली. चालू हंगामातही तेवढीच घट येण्याची शक्यता आहे. साधारणत: उत्पादन घटले, की भाववाढ होते, हा अर्थशास्त्राचा साधा नियम; मात्र गेल्या दोन हंगामांत देशांतर्गत उत्पादनात घट येत असताना साखरेचे दर नीचांकी पातळीवर आहेत. दरम्यान, एकीकडे उत्पादनात घट येत असताना दर वाढत नाहीत, तर दुसरीकडे साखर उत्पादनाच्या खर्चात वाढ होत असल्यामुळे साखर उद्योग दुहेरी संकाटात सापडला आहे.

पाच वर्षांपूर्वी साखरनिर्मितीसाठी प्रतिटन ७५० रुपये प्रक्रिया खर्च येत होता. आता त्यासाठी १२०० रुपये खर्च करावे लागतात.

# डोंगराळ भागातील आदिवासी बांधव उदरनिर्वाहसाठी ग्रामीण भागात डेरेदाखल

● पेण, विशाल पाटील :

पेण तालुक्याच्या डोंगराळ भागातील असणारे हजारो आदिवासी बांधव आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहसाठी पावसाळा संपल्यावर शहराच्या जवळपास काम करण्यासाठी ग्रामीण भागांमध्ये कुटुंबांसह डेरेदाखल झाले आहेत मात्र त्यांची मुले स्थलांतरित होत असताना चार- पाच महिन्यांसाठी त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या अंतोरे मराठी शाळा येथे त्यांना प्रवेश दिला आहे. तालुक्याच्या पांचगणी, उमरमाल, खैसा, तांबडी, जावळी निधवली डोंगरपट्टी, पाबळ कुरनाड खोरे, चांदेपट्टी वरवणे डोंगरपट्टी, कासमाल डोंगरपट्टी विभाग, दिवाणमाल, बांगरवाडी, वेताळपट्टी यासह इतर डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांना पावसाळ्यात त्या ठिकाणी भाजीपाला यासह विविध लागवड करून आपली उपजीविका भागवत असतात मात्र पावसाळ्यानंतर हिवाळा आणि उन्हाळ्याच्या दरम्यान हाताला काम मिळण्यासाठी या डोंगरावर भागातील हजारो आदिवासी कुटुंब शहराच्या अगदी लगत असणाऱ्या ग्रामीण भागात येऊन आपल्या कुटुंबासह डेरेदाखल होतात. त्यामध्ये म्हाडा कॉलनी, अंतोरा फाटा, बोरगाव रोड, महाडिक वाडी या भागामध्ये छोटीशी झोपडी बांधून त्या ठिकाणी चार- पाच महिन्यांसाठी

## ■ स्थलांतरित झालेल्या विद्यार्थींना अंतोरे शाळेत प्रवेश




स्थलांतरित होऊन आपल्या कुटुंबासह ते दररोज कामकाजाच्या शोधात असताना पेण शहरांमध्ये सुरू असलेल्या बांधकामांवर मोलमजुरीचे काम करतात तर काही तरुण जेष्ठ नागरिक ग्रामीण भागातील वाढणा-या मोठमोठ्या झाडांना तोडण्याचे काम करून त्यामधून त्यांना मिळणाऱ्या रोजच्या मोबदल्यातून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतात मात्र यामुळे त्यांच्या मुलांचे शैक्षणिक वर्ष वाया जात असल्याने राज्य शासनाने आशा स्थलांतरित मुलांना विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश देऊन इतर विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षकांनी काम केले पाहिजे या आदेशामुळे स्थलांतरित विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश दिला जात आहे.मात्र यादरम्यान आपल्या हाताला काम मिळण्यासाठी डोंगराळ भागातील हजारो आदिवासी बांधव ग्रामीण भागाच्या परिसरात आपल्या कुटुंबासह डेरेदाखल झाले आहेत.

डोंगराळ भागातील आदिवासी बांधव पावसाला संपतात हिवाळयाच्या दरम्यान आपल्या मुलाबाळांना घेऊन कुटुंबाच्या कुटुंब पेणच्या आजूबाजूच्या परिसरात वास्तव्याकरीता येतात मात्र यादरम्यान त्यांच्या मुलांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता शासनाच्या आदेशानुसार अशा स्थलांतरित मुलांचा सर्व्हे करावा मुख्याध्यापक महेंद्र बैकर, सहाय्यक शिक्षक राजेंद्र पाटील यांनी नुकतेच केला असून स्थलांतरित झालेल्या पांचगणी येथील सहा- सात विद्यार्थ्यांना अंतोरे मराठी शाळेत प्रवेश दिला आहे.